सोमवार, २० मार्च २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक २४०
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## मोदी-शाहांनी बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण केले -मुख्यमंत्री



**खेड** : येथील गोळीबार मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा रविवारी (दि. १९) झाली. या सभेत त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, परदेशात या देशाची बदनामी करणारे राहुल गांधी यांना पंतप्रधान करायला निघालेल्या लोकांबरोबर आपण जाणार आहोत का? बाळासाहेबांनी ज्यांना नेहमी दूर ठेवले, अशा लोकांना तुम्ही जवळ करणार का? बाळासाहेब म्हणायचे, मला एक दिवस देशाचा पंतप्रधान करा, देशातले ३७० कलम हटवतो. राममंदिर बांधण्याचे स्वप्न बाळासाहेबांचे होते. आज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली अमित शाह यांनी ३७० कलम हटवून दाखवले, बाळासाहेबांचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले, असे त्यांनी सांगितले.


अंतरंग

पनवेलमध्ये धुमाकूळ घालणारा डिझेलमाफिया ताब्यात/३

मांगूर मत्स्य व्यावसायिकांना महावितरणचा 'शॉक'/५

अल्पवयीन मुलावर अत्याचार; पालीमध्ये मूक मोर्चा/७


# गुळसुंदे विभागात कोट्यवधींच्या कामांचा झंझावात

## आमदार महेश बालदी यांच्या हस्ते लोकार्पण व भूमिपूजन

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या विकासनिधी अंतर्गत गुळसुंदे पंचायत समिती विभागातील कोट्यवधींच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी (दि. १८) करण्यात आले.

यामध्ये दहा लाखांच्या निधीतून लाडिवली येथील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्ता काँक्रीटीकरण कामाचे लोकार्पण, ३० लाखांच्या निधीतून गुळसुंदे येथील शंकर मंदिर परिसर सुशोभिकरण करण्याच्या कामाचे लोकार्पण, ३० लाख रुपयांच्या निधीतून गुळसुंदे अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन, ९७ लाख रुपयांच्या निधीतून वावेघर येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन, १५ लाख रुपयांच्या निधीतून वावेघर येथील मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे लोकार्पण, १० लाख रुपयांच्या निधीतून जाताडे येथील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे लोकार्पण, सात लाखांच्या निधीतून पोसरी येथील अंतर्गत आरसीसी गटाराचे लोकार्पण, दोन लाखांच्या निधीतून वावेघर येथे पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन, ९५ लाखांच्या निधीतून तुराडे येथील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ, १५ लाखांच्या निधीतून तुराडे येथील ग्रामपंचायत कार्यालय बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन, सहा लाख रुपयांच्या निधीतून रसायनी कॉर्नर येथे बसथांब्याचे लोकार्पण करण्यात आले.

रसायनी कॉर्नर येथे बस थांबा लोकार्पणावेळी जि. प. विभाग अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, सरपंच संगीता काळूराम तोंडे, **(पान २ वर..)**



(अधिक छाया पान ३ वर...)

# महाडमधील धरणांचे ग्रहण सुटले

## मविआ सरकारने दिलेली स्थगिती उठणार | आमदार दरेकरांच्या प्रयत्नांना यश

**महाड : प्रतिनिधी**

विधान परिषदेमध्ये भाजप आमदार रणजित सिंह मोहीते पाटील यांनी उजनी धरणाबाबत लक्षवेधी उपस्थित केली होती. या वेळी आमदार प्रवीण दरेकर यांनी महाविकास आघाडी सरकारने महाड तालुक्यातील चार धरणांना स्थगिती दिली होती. ती उठवण्यात यावी अशी मागणी केली असता, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक उत्तर दिले.

महाड तालुक्यात एप्रिल, मे महिन्यात पाण्याचा प्रश्न गंभीर होतो. अनेक गावांत पाणीटंचाई निर्माण होते व अशा वेळी टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. महाड



तालुक्याची तहान भागविण्यासाठी काळ जलविद्युत प्रकल्प होणे गरजेचे आहे, मात्र हा प्रकल्प गेली दहा वर्षे रखडला आहे. तालुक्यातील कोथेरी, नागेश्वरी आणि सवाद धारवली हे धरण प्रकल्पदेखील रखडले आहेत. युती सरकारच्या काळात गिरीश महाजन हे जलसंपदा मंत्री असताना यासाठी आमदार प्रवीण दरेकर यांनी पुढाकार घेऊन सुधारित प्रकल्प मान्यता घेतली व कोथेरी धरणासाठी ११६ कोटींची सुप्रमा मिळून कामास गती मिळऊन दिली होती, मात्र यास महाविकास आघाडी सरकारने स्थगिती दिली होती.

याबाबत विधान परिषदेत प्रश्न उपस्थित करून आमदार दरेकर यांनी ऐतिहासिक महाड तालुक्याच्या या पाणी प्रश्नाविषयी स्थगिती तत्काळ उठविण्याची मागणी केली, तसेच प्रकल्पांचे रखडलेले काम आणि शेतकऱ्याच्या भू-संपादनाचा विषय मार्गी लावावा, अशी मागणी लावून धरली. त्यांच्या या प्रश्नाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक उत्तर देऊन, तत्काळ कार्यवाहीचे आदेश देऊ, असे आश्वासित केले.

# शेकापतून भाजपमध्ये इनकमिंग सुरूच

## खानावळे माजी सरपंचांचा समर्थकांसह प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकापचे ग्रुप ग्रामपंचायत खानावळे माजी सरपंच अनंता शिंदे यांनी आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत रविवारी (दि. १९) भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

अनंता पांडुरंग शिंदे यांच्यासमवेत ज्येष्ठ कार्यकर्ते विष्णू शिंदे, युवा कार्यकर्ते अमीर जंगम, प्रताप शिंदे, जीवन कदम यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात आमदार महेश बालदी यांनी अनंता पांडुरंग शिंदे यांच्यासह इतर कार्यकर्त्यांना पक्षाची शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे पक्षात स्वागत केले.



या वेळी गुळसुंदे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, पोयंजे पंचायत समिती माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर सुर्वे, गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायत सरपंच हरिश्चंद्र बांडे, गुळसुंदे ग्रामपंचायत सदस्य मनोज पवार, वावेघर ग्रामपंचायत सदस्य जगन्नाथ चव्हाण, भाजप तुराडे गाव अध्यक्ष प्रतीक भोईर, घोसाळवाडी बूथ कमिटी अध्यक्ष दिनेश सुर्वे, युवा कार्यकर्ते काशिनाथ तांबे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### अफूची शेती करणाऱ्या शेतकऱ्यावर कारवाई

**पुणे** : आंबेगाव तालुक्यामधील गंगापूर गावामध्ये अफुची शेती करणाऱ्या शेतकऱ्यावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत दोन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गंगापूर येथील शेतकऱ्याच्या शेतात एक लाख ८७ हजार रुपये किमतीचे अफुची शेती करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. अफुची शेती करण्यासाठी लागणारे, सर्व साहित्य, बी-बियाणेसुद्धा पोलिसांना या वेळी तपासात सापडले.

### मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या महिलेला कारने चिरडले

**मुंबई** : वरळी सी फेसजवळ एका भरधाव कारने मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या एका महिलेल्या चिरडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या अपघातात महिलेचा उपचारदरम्यान मृत्यू झाला आहे. ही घटना रविवारी सकाळी ६.३०च्या सुमारास घडली. याप्रकरणी वरळी पोलिसांनी कार चालकाला ताब्यात घेतले असून पुढील तपास करीत आहेत. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, अपघात एवढा भीषण होता की, महिला अनेक फूट उडून पडली. यात तिच्या डोक्याला जबर मार लागल्याने तिचा मृत्यू झाला. कारचाचालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# भाजप कायम निवडणुकीची तयारी करीत असतो -मंत्री चंद्रकांत पाटील

**पुणे : प्रतिनिधी**

भाजप एक निवडणूक झाली की, पुढच्या निवडणुकीची तयारी करीत असतो. त्यानुसार गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील विधानसभेच्या २८८ आणि लोकसभेच्या ४८ जागांची आम्ही तयारी करीत आहोत. शिवसेनेच्या वाट्याला किती जागा येतील, हे आता ठरवण्याचे काही कारणच नाही. त्यांना आमची तयारी उपयोगी पडेल, असे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले की, उपमुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत सभागृहात सकारात्मक असल्याचे सांगितले आहे. यासाठी तीन रिटायर्ड आयएएस अधिकाऱ्यांची समिती नेमली आहे. हा परीक्षांचा कालावधी आहे आणि रुग्णांचे मोठे हाल होत आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेन्शनबाबत सकारात्मक असल्याचे वारंवार सांगितले आहे. माझे सर्व कर्मचाऱ्यांना आवाहन आहे की परीक्षेचा कालावधी आहे. रुग्णांचे भयंकर हाल होत आहेत. त्यामुळे निदान अत्यावश्यक सेवा सुरू ठेवाव्यात. कोणत्याही संपाचे दोन भाग असतात. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून काम करायचे असते. बाकीच्यांनी संप करायचा असतो, पण अत्यावश्यक सेवेतील कर्मचारीही संपात उतरले आहेत. त्यांच्या घरातही कोणीतरी आजारी पडले. सरकार जुनी पेन्शन योजनेबाबत नकारार्थी नाही. त्याचा भार किती पडेल, याचा अभ्यास करण्यासाठी वेळ लागेल.

## लैंगिक छळाबाबत वक्तव्यामुळे राहुल गांधींची चौकशी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली पोलीस थेट काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निवासस्थानी पोहचले. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान आपल्या भाषणात उल्लेख केलेल्या लैंगिक छळ झालेल्या पीडितांचा उल्लेख केला होता. त्याची माहिती घेण्यासाठी त्यांना देण्यात आलेल्या नोटीसीच्या संदर्भात दिल्ली पोलीस काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या निवासस्थानी पोहचली.

विशेष आयुक्त सागर प्रीत हुड्डा यांनी सांगितले की, राहुल यांची भेट झाली. आम्हाला जी माहिती हवी होती, ती माहिती ते आमच्यासोबत शेअर करणार आहेत. त्यांना पुन्हा एकदा नोटीस देण्यात आली असून नोटीस त्यांच्या कार्यालयाने घेतली आहे. १६ मार्च रोजी दिल्ली पोलिसांनी राहुल गांधींना नोटीस दिली होती, मात्र राहुल यांनी त्याला प्रतिसाद दिला नाही.

यानंतर दिल्ली पोलीस रविवारी त्यांच्या घरी पोहोचले. दरम्यान, पोलिसांनी राहुल गांधी यांच्या घराबाहेर उभ्या असलेल्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.


## राज्यात आणखी दोन दिवस यलो अलर्ट

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पुढील दोन दिवस पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला असून, त्यानंतर पावसाचा जोर ओसरणार आहे. दरम्यान, कमाल तापमानात वाढ होण्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तविला आहे.

गेले चार ते पाच दिवस राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यातही मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील काही जिल्ह्यात गारपिट झाल्याने शेती उद्ध्वस्त झाली आहे. मार्च महिन्यात सलग दुसऱ्यांदा अवकाळी पावसाने राज्याला झोडपले आहे. आधीच्या नुकसानीचे पंचनामे होत असतानाच पुन्हा गारपिटीने झोडपल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. सोलापूर, यवतमाळ, जालना, परभणी, अमरावती, अकोला आदी जिल्ह्यांत गारपीट झाली आहे. कोकण, गोवा वगळता मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात यलो अलर्ट आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी, तर मराठवाडा, विदर्भात बहुतांश ठिकाणी पावसाचा जोर राहील.

# म्हसळ्यात दिवसाढवळ्या रस्त्यावर बिबट्याचा संचार



**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यात दिवसाढवळ्या एक बिबट्या रस्त्याच्या मधोमध शांतपणे बसलेला दिसल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे.

शनिवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या दरम्यान म्हसळा-देवघर कोंड-कुडतोडी या रस्त्यावर मनीष संतोष चाळके यांना बिबट्याचे दर्शन झाले. मनिष म्हसळ्याहून आपल्या गावी कुडतोडी येथे जात होते. बिबट्या देवघरकोंड रस्त्याच्या वरील बाजूस वन विभागाच्या काजूचा माळ या भागांत रस्त्याच्या मधोमध निवांत बसला होता.

मनिषने या परिसरांत अजून एक मोठा बिबट्या असून त्याचेही अनेक वेळा दर्शन होत असते, असे सांगितले. याबाबत मनिष यांनी त्वरीत वनविभागाला कळविले.

चिचोंडा वनपाल प्रविण शिंदे यांनी कुडतोडी, देवघर, देवघर कोंड या परिसरांतील नागरिकांना सर्तकतेचा इशारा दिला असून रात्रीच्या वेळी जंगलात एकटे न फिरणे, जनावरांना एकटे न सोडणे याबाबत जनजागृती केली आहे.

> **फेब्रुवारी ते मार्चपर्यंत लागलेल्या वणव्यांमध्ये वन खात्याचे २५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यामुळे जंगलातील श्वापदे सुरक्षित आणि खाद्य असणाऱ्या ठिकाणी वास्तव्य करतो. जंगले उद्ध्वस्त झाल्याने या श्वापदांनी आपला मोर्चा आता नागरी वस्तीकडे वळविला आहे.**
> **-जनार्दन सुर्यवंशी, सेवानिवृत डीएफओ**

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पनवेलमध्ये द्वारकादास शामकुमार शोरूमचे उद्घाटन

**पनवेल : प्रतिनिधी**

अनुभव, जिद्द आणि मेहनतीने पनवेलकरांचा विश्वास मिळवल्याने आज पनवेलमधील मोजक्या मोठ्या उद्योजकांत शेळके परिवाराचे नाव आहे, असे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

पनवेलमध्ये द्वारकादास शामकुमार ग्रुपच्या मे. द्वारकादास शामकुमार एक्सक्लुसिव्ह शोरूमच्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १९) झाले. या वेळी अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील, रंग माझा वेगळामधील सौंदर्या- हर्षदा खानविलकर व सुख म्हणजे काय असते शालिनी- माधवी निमकर यांची प्रमुख उपस्थित लाभली. नेहा देशमुख, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, अॅड. वृशाली वाघमारे, रुचिता लोंढे, प्रिया मुकादम, प्रिती डाके आदी कार्यक्रमाला उपस्थित होते.

द्वारकादास शामकुमार ग्रुपला शुभेच्छा देताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पनवेलकरांना साडी खरेदीचे मोठे दालन उपलब्ध करून दिल्याबद्दल धन्यवाद दिले. **(पान २ वर..)**





(अधिक छायाचित्रे पान ३ वर...)

# पर्यावरणपूरक रेडिमेड गुढ्यांना बाजारपेठेत नागरिकांकडून मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

चैत्रशुद्ध प्रतिपदेला साजऱ्या होणाऱ्या गुढीपाडव्याचा उत्साह सर्वत्र दिसून येत आहे. या दिवशी पर्यावरणपूरक गुढी उभारली जावी या विचारांतून अशा गुढी बाजारात दाखल झाल्या आहेत.

महाराष्ट्रात सर्वत्र हा दिवस घरासमोर गुढी उभारून साजरा केला जातो. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते.



पर्यावरणपूरक गुढ्या या उंचीने लहान असून कमी जागेत उभारल्या जाऊ शकतात. सुक्या लाकडापासून त्या बनविल्या जातात. अतिशय आकर्षक दिसणाऱ्या या गुढी बाजारात २०० रुपयांपासून विक्री केल्या जात आहेत.

> **या गुढी पूर्णपणे पर्यावरणपूरक आहेत. सुक्या लाकडापासून बनविल्या असून अगदी लहान आकारामुळे हाताळणीस सोप्या व सुलभ आहेत. २०० रुपयांना ही गुढी विकली जाते. याला चांगला प्रतिसाद दिला असून चांगली विक्री होत आहे.**
> **-नरेंद्र पेणकर, विक्रेता**

# दूध भेसळ रोखण्यासाठी कडक कारवाई करणार

### दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील




**मुंबई : प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाकडे 'आरे'कडील कर्मचारी वर्ग वळवून दूध भेसळ रोखण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

मंत्री विखे- पाटील म्हणाले, येणाऱ्या काळात दूध भेसळ रोखण्यासाठी एक हेल्पलाईन तयार करण्यात येईल. जेणेकरुन या हेल्पलाईनवर ग्राहकांना दूध भेसळीबाबत तक्रार करता येईल. सध्या राज्यात ७० टक्के दूध संकलन हे खासगी क्षेत्राकडून, ३० टक्के दूध संकलन हे सहकारी क्षेत्राकडून केले जात आहे. जागतिकीकरण व खुली स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर दुधाचे दर हे बाजारातील मागणी व पुरवठ्यावर अवलंबून असतात. खासगी क्षेत्रातील दूध व्यावसायिक व त्यांच्या मार्फत खरेदी व विक्री करण्यात येणाऱ्या दुधाच्या दरावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. येणाऱ्या काळात एक विशेष अभ्यासगट तयार करुन यामध्ये ग्रामीण भागातील प्रतिनिधी आणि या क्षेत्रातील तज्ञ घेऊन सहकारी दूध संघांना बळकटी देण्यासाठी काय करता येईल, याबाबत अभ्यास करण्यात येईल.

राज्यात सहकारी दूध संघांची शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या., (महानंद) ची स्थापना करण्यात आली असून, २५ जिल्हा सहकारी दूध संघ व ६० तालुका सहकारी दूध संघ महासंघाचे सदस्य आहेत. महासंघाच्या उपविधीनुसार सदस्य संघांनी त्यांच्या एकूण संकलनाच्या ५ टक्के दूध पुरवठा महासंघास करणे आवश्यक होते. तथापि, बऱ्याच सदस्य संघांनी या तरतुदीचे पालन केले नाही, त्यामुळे महासंघांचे दूध संकलन कमी झाले. महासंघाची आर्थिक स्थिती ढासळण्यामागे असलेल्या कारणांपैकी हे एक मुख्य कारण आहे. दुग्धव्यवसायातील सहकार क्षेत्रातील शिखर संस्थेच्या आर्थिक स्थितीचा विपरीत परिणाम सदस्य संघ व त्यांच्या अधिनस्त असलेल्या प्राथमिक सहकारी संघावरही झाला. महासंघाला आर्थिक सुस्थितीत आणण्यासाठी नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या माध्यमातून पर्यायांचीही तपासणी करण्यात येत आहे. दूध व्यवसायात खासगी व्यावसायिकांच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी शासनाकडून सहकारी जिल्हा व तालुका संघांना अर्थसाहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुसार राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत आजपर्यंत ४१ संघांना २९५.९६ कोटी रुपये इतके अनुदान स्वरुपात उपलब्ध करुन दिले आहे. राष्ट्रीय दुग्धविकास कार्यक्रमांतर्गत ४३ सहकारी संघांना ३१.९१ कोटी रुपये इतके अनुदान उपलब्ध करुन दिले आहे.

या बाबी राज्यातील सहकारी क्षेत्रातील जिल्हा/तालुका/ प्राथमिक सहकारी दूध संघांना पर्यायाने दूध उत्पादकांना सहाय्यभूत ठरणाऱ्या आहेत, असे मंत्री विखे पाटील यावेळी म्हणाले.

### सूचनांचा अभ्यास केला जाईल

**दिवाळीच्या दरम्यान दूध संघातील कर्मचाऱ्यांना बोनस देणे हे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. अभ्यास गट तयार करुन सूचनांचा अभ्यास केला जाईल. दुधाच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त दूध उत्पादनाच्या काळात सहकारी संस्थांना दूध पावडर करुन निर्यात करण्याची परवानगी देण्याची मागणी करण्यात आली असून याबाबत अभ्यास केला जाईल, असेही मंत्री विखे- पाटील म्हणाले.**

## राजश्री येवले यांचा शेकडो महिला कार्यकर्त्यांसह शिंदे गटात प्रवेश

### अंतर्गत राजकारणाला कंटाळून राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी



**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील राष्ट्रवादीच्या महिला उपजिल्हाध्यक्षा राजश्री येवले यांनी त्यांच्या शेकडो महिला कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी त्यांना भगवे उपरणे व झेंडा देत त्यांचे स्वागत केले.

राजश्री येवले या अनेकवर्ष सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. असंघटित महिला कामगारांची संघटना त्या चालवतात. सातत्याने या महिलांना त्या मदत करत असल्याने शेकडो महिला त्यांच्यासोबत जोडल्या गेल्या आहेत. आमदार गणेश नाईक यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिल्यावर नवी मुंबई राष्ट्रवादीत पोकळी निर्माण झाली होती. अवघे हाताच्या बोटावर मोजता येण्याइतपत नगरसेवक उरल्याने एक नंबरचा पक्ष क्षणार्धात चौथ्या क्रमांकावर पोहोचला होता. त्यामुळे संघटन बांधणीचे राष्ट्रवादी पुढे आव्हान होते. सानपाडा विभाग संपूर्णपणे शिवसेना व भजपाच्या कवेत असतानाच राजश्री येवले यांनी सातत्याने पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न केले. घरोघरी संपर्क साधत जनतेचे प्रश्न सोडवता राजश्री येवले यांनी पक्ष वाढवण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे सानपाड्यात राष्ट्रवादीला बळ मिळू लागले होते. पक्ष बांधणीसोबत पालिकेकडे पाठपुरावा करून अनेक समस्या त्यांनी मार्गी लावल्या. मात्र पक्षातील अंतर्गत राजकारणाच्या बळी पडल्या व त्यातून त्यांनी अखेर पक्षाचा राजीनामा देत अखेर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे येत्या काळात युतीमध्ये लढणाऱ्या भाजपाला, शिवसेनेला सानपाड्यात ठाकरे गटाशी दोन हात करताना राजश्री येवले यांची मोठी मदत होणार आहे.

यावेळी उपजिल्हा प्रमुख रोहिदास पाटील, दीपक सिंग, अजित सावंत, नवी मुंबई सहसंपर्क प्रमुख सचिन कांबळे, रामचंद्र पाटील, माजी नगरसेविका ऋचा पाटील, उपशहर प्रमुख तय्यब, पटेल, दादा झेंडे, विभाग प्रमुख विसाजी लोके, कामगार नेते मंगेश लाड, माजी सैनिक सेनेचे जिल्हा संघटक सुरेश काकडे, प्रकाश आमटे, इत्यादी उपस्थित होते.

## माणगाव येथे सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**माणगांव : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत माणगांव पोलीस ठाणे येथे रविवारी रुग्णवाहिकेचे उद्‍घाटन पार पडले.

शांती निवास ओल्ड एज होम यांच्या सौजन्याने देण्यात आलेली ही रुग्णवाहिका माणगांव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील व माणगांव पोलीस तसेच माणगांव तालुक्यात कार्यरत असलेली साळुंखे रेस्क्यू टीम यांच्याकडे असणार आहे. माणगाव तालुक्यात तसेच परिसरात होणारे अपघात, पूर परिस्थिती, दरड ई. आपत्कालीन काळात तत्काळ घटनास्थळी पोहचून या रुग्णवाहिकेमार्फत सहाय्य करण्यास मदत होणार आहे.

या रुग्णवाहिकेमध्ये आपत्कालीन काळात रेस्क्यूसाठी लागणारी सर्व साधनसामग्री व साहित्य उपलब्ध असणार आहे. त्यामुळे या रुग्णवाहिकेचा फायदा अनेक नागरिकांना होणार असल्याची माहिती रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली आहे. यावेळी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या समवेत पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, स. पो. नि. सतीश आस्वर, पो. उपनिरीक्षक कीर्तीकुमार गायकवाड, सुर्यकांत भोजकर, मगर, पोलीस अधिकरी व कर्मचारी, माणगांव तालुका साळुंखे रेस्क्यू टीम अध्यक्ष रवींद्र मोरे व साळुंखे रेस्क्यू टीम सदस्य आदी उपस्थित होते.

## साखरमाळांना गुढी पूजनात मान

**खोपोली :** येथील बाजारपेठेत त असलेल्या दुकानात गुढीपूजनात मान असलेल्या साखरगाठी घेण्यासाठी ग्राहकांची लगबग सुरू झाली आहे. अनेक वर्षापासून गुप्ता बंधू पारंपारिक पद्धतीने साखरमाळा विक्री करीत आहेत.

अनेक पिढ्या हा व्यवसाय आपण करीत असल्याचे गुप्ता यांनी बोलताना सांगितले. त्यांनीच तयार केलेल्या या साखर माळा त्या अनेक वर्ष विक्रीचा व्यवसाय करीत आहेत. त्यांनी तयार केलेल्या या साखरमाळांना परिसरातील गावांमध्ये मोठी मागणी असते.

# दुप्पट मालमत्ता कर रद्दसाठी पालिका सकारात्मक मात्र शासनाचे लिखित निर्देश नाहीत

### नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त चिंताग्रस्त

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील भूमिपुत्रांनी गरजेपोटी बांधलेल्या अनियमित घरांना पालिकेने दुप्पट मालमत्ता कर लावला आहे. तत्कालीन आयुक्त अभिजित बांगर यांनी तीन पट मालमत्ता कर लावण्याचा निर्णय घेतला होता. त्याविरोधात नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांमध्ये संतापाची भावना होती. हा जाचक कर रद्द करावा अशी मागणी केली जात होती. आमदार मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात कर रद्द करण्याची मागणी मान्य करण्यात आलेली आहे. मुख्यमंत्र्यांनी नगरविकास विभागाला तसे आदेश दिलेले आहेत. पालिकेने देखील आमदार मंदा म्हात्रे यांच्या पत्रानुसार नगर विकास विभागाकडे याबाबत तातडीने आदेश काढून तसे निर्देश देण्याची विनंती केली आहे.



मात्र अद्याप नगरविकास विभागाकडून संथ गतीने कारवाई होत आहे. त्यामुळे कर आकारणी रद्द करण्याबाबत पालिका सकारात्मक असताना देखील नगरविकास खात्याकडून होत असलेल्या दिररंगाईबाबत पालिकेला अंमलबजावणी करता येत नसल्याचे चित्र आहे त्यामुळे गरजेपोटी बांधकाम केलेले प्रकल्पग्रस्त चिंताग्रस्त आहेत.

आ. मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्र्यांकडे वाढीव मालमत्ता कर कमी करण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. याबाबत सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने नगर विकास विभागाला याबाबत प्रस्ताव सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार पालिकेने नगरविकास विभागाकडे अहवाल सादर केला आहे. २०१७ च्या सुधारित अध्यादेशानुसार शास्ती आकारण्याबाबतचे अधिकार महानगरपालिकांना देण्यात आले आहेत.

त्यानुसार १ एप्रिल २०१८ पासून कर शास्ती आकारणी करणे आवश्यक होते. मात्र अद्याप त्याबाबत कोणतीही कारवाई पालिकेने केली नव्हती. मात्र या दरम्यान २६ फेब्रुवारी २०२२ रोजी उच्च न्यायालाने सूमोटो याचिका दाखल करून पालिकांना अनधिकृत इमारतीस दुप्पट मालमत्ता कर करून वसुली करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार नवी मुंबईत दुप्पट कर आकारणी करण्यात येत आहे.

### गरजेपोटी घरांच्या कर आकरणीबाबीत पालिका संभ्रमात

एकीकडे मुख्यमंत्र्यानी कर रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. तर दुसरीकडे उच्च न्यायालयाचे आदेश पालिकेच्या अंमलबजवणीच्या आड येत आहेत. दुसरीकडे पालिका गरजेपोटी घरांचा कर रद्द करण्यासाठी सकारात्मक आहे. पालिकेने नगरविकास विभागाकडे मुख्यमंत्र्यांच्या या आदेशानुसार गरजेपोटी घरांसाठी मार्गदर्शनपर लेखी निर्देश देण्याची मागणी केली आहे. त्यानंतरच तातडीने कर रद करण्याबाबत अंमलबजावणी होऊ शकणार आहे.पालिकेकडून गरजेपोटी घरांसाठी मालमत्ता कर भरण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. त्यासाठी पत्र पाठवले जात आहे. मात्र त्यास नोटीस समजून प्रकल्पग्रस्तांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मात्र दुसरीकडे नगरविकास विभागाच्या आदेशाकडे पालिकेचे डोळे लागले असून, आदेश येताच पालिका आकारलेला कर रद्द करण्याच्या भूमिकेत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

६०० चौ. फुटापर्यंतची निवासी बांधकाम असल्यास शास्तीचा दंड शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये.

६०१ ते १००० चौ. फुटापर्यंतचे निवासी बांधकाम असल्यास प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५०% दराने शास्ती आकारण्यात यावी.

१००१ चौ. फुटापुढील निवासी बांधकाम आकारावयाच्या प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी (सध्याच्या दराने)

**"शासनाचे हे निर्देश असेल तरी नवी मुंबईतील घरे अनधिकृत नसून अनियमित आहेत. अधिनियम २६७ व २६७ अ मध्ये याबाबत स्पष्टता नाही. यात अधिनियमात अनधिकृत घरांना मालमत्ता कर आकारण्याबाबत नियमावली दिलेली आहे. त्यामुळे ज्यांच्या जमिनी गेल्यात व त्यांनी आपली गरजेपोटी घरे वाढवली आहेत ते अनधिकृत नाही तर अनियमित घरांमध्ये मोडतात. त्यामुळे अनियमित घरांना लावलेला कर या अनियमित घरांना लागू होत नाही. याबाबत पालिकेने केलेल्या विनंतीनुसार शासनाच्या नगरविकास खात्याने पालिकेला मार्गदर्शन करून या अनियमित घरांचा कर रद्द करण्याबाबत निदश देणे आवश्यक आहे.**

**- विजय घाटे, भाजपा महामंत्री**

पान १ वरुन

## गुळसुंदे विभागात विकासकामांचा झंझावात

उपसरपंच बंडू चांगु शिद, सदस्य सुनीता कमलाकर शिद, ग्रामसेवक अंकुश पाटील, सुजित पाटील, सुमेधा पाटील, भारतीनाथ पाटील, विशाल जोशी, कमलाकर शिद, सचिन शिंदे, चंद्रकांत जांभुळकर तसेच लाडिवली स्मशानभूमी रस्ता लोकार्पण सोहळ्यावेळी गुळसुंदे सरपंच हरिश्चंद्र बांडे, प्रभाकर कार्लेकर, अनंता म्हामणकर, राम कार्लेकर, दत्तात्रेय कार्लेकर, मंगेश जाधव, वसंत गोळे, भगवान गोडिवले, महोदव शिर्के, मोहन वाघे, भास्कर पाटील, योगेश गोळे, समीर भोईर, गणपत गोठळ, ग्रामपंचायत सदस्या प्रभावती कार्लेकर, अनामिका म्हामणकर, इंदूबाई शिर्के, कोमल वाघे, शारदा कार्लेकर, शितल शिगवण, मानसी कार्लेकर, शर्मिला जाधव, हर्षदा शिर्के, लोना सप्लाय कामगार आदी उपस्थित होते.

याचबरोबर गुळसुंदे शंकर मंदिर सुशोभिकरण कामाच्या लोकार्पणावेळी सदस्य मनोज पवार, माजी सरपंच आर. डी. पाटील, प्रमोद विध्वंस, यशवंत जाधव, जितेंद्र गाताडे, प्रशांत पाटील, अजिंक्य सुर्वे, दिपक पारंगे, संतोष चौलकर, सतीश साठे, बाळू जोशी, प्रकाश जोशी, सुरेश जोशी, यशवंत जोशी, मिन्नाथ तांबोळी, नामदेव मांडवकर, जयराम शिंदे, दीपक मिसाळ, महादेव कावडे, सरपंच चंद्रकांत भोईर, उपसरपंच हरिश पाठारे, सतीश भोईर, सतीश ठाकूर, संदीप दळवी, महिला अध्यक्ष दिपीका ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते काका गायकवाड, सुनील राठोड, प्रफुल पाठारे, अक्षय पाठारे, महादू दोरे, कमलाकर पारधी आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पनवेलमध्ये द्वारकादास शामकुमार शोरूमचे उद्‍घाटन

त्याचबरोबर उपस्थितांना साडीची निवड करा पण आपल्या अर्धांगिनीला सोबत घेऊन आल्याशिवाय करू नका, असा सल्लाही दिला. आमदार बाबासाहेब पाटील यांनी, शेळके परिवार हा आपल्या मतदारसंघातला असौन गोविंदराव यांचा जन्म गरीब कुटुंबात झाला. त्यांनी तेथे एका दुकानात नोकरी केली, मग शहरात येऊन द्वारकादास कुटुंबाचा विश्वास संपादन केला. आज त्यांच्या पनवेलसह इतर शहरात असलेल्या शाखांचा विस्तार झाला. त्याबद्दल त्यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.


अभिनेत्री हर्षदा खानविलकर यांनी, साडीखरेदी हा माझा परमोच्च आनंदाचा क्षण असल्याचे सांगून आपण त्यामध्ये जाणकार असल्याने इथे खरेदीला आल्यावर आपला एक संपूर्ण दिवस जाईल. तुम्हीही इथे खरेदीसाठी आवश्य या असे सांगून द्वारकादास शामकुमारची मुंबईला कधी शाखा सुरू होते, त्याठिकाणी मला कधी बोलवणार याची वाट पाहत असल्याचे सांगून त्यांनी शुभेच्छा दिल्या. अभिनेत्री माधवी निमकर यांनी, आज या ठिकाणी मी चांगला क्षण अनुभवत आहे. मला साडी नेसायला आवडते, पण त्यातील प्रकार समजत नाहीत, पण हर्षदाताईला ते चांगले समजते. आज ती सोबत असल्याने मला पनवेकरांसोबत एक चांगला क्षण अनुभवायला मिळत असल्याचे सांगितले.

## उरण-पनवेल मार्ग सोमवारपासून दुरुस्तीसाठी बंद

**उरण : प्रतिनिधी**

उरण-पनवेल रस्ता प्रवाशाच्या दृष्टीने महत्वाचा असून दररोज हजारो प्रवाशी या मार्गांवरून प्रवास करतात. मात्र उरण येथील उरण-पनवेल मार्गावरील दोन साकवच्या दुरुस्तीसाठी २० मार्चपासून हा मार्ग प्रवासी वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे.

बांधकाम विभागाने या संदर्भात सूचना फलक बसविले आहेत. त्यानुसार उरण-पनवेल मार्गावरील उरण रेल्वे स्थानक व आनंदी हॉटेलजवळील दोन साकव नादुरुस्त आहेत. त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू करणार आहे. या कामासाठी २० मार्चपासून उरण-पनवेल मार्गावरील बोकडविरा पोलिस चौकी ते उरण कोटनाका राघोबा मंदिर हा मार्ग वाहनांसाठी बंद करण्यात येणार आहे. प्रवासात होणारे हाल, जनतेच्या मागणीचा विचार करून व भविष्यातील होणारे अपघात टाळण्यासाठी पूल दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्याचे बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले आहे. उरण-पनवेल हा मार्ग वाहतुकीसाठी बंद केल्याने उरण शहरात व शहरातून ये-जा करण्यासाठी नागरिकांनी नवीनशेवा-उरण चारफाटा मार्गाचा पर्यायी मार्ग म्हणून वापर करण्याची सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे.




## वरळी सी फेस येथील अपघातात महिलेचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

वरळी सी फेस येथे भरधाव वेगाने येणाऱ्या मोटरगाडीने दिलेल्या धडकेत ४२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. महिला रविवारी पहाटे वरळी सीफेस येथे चालण्यासाठी आली होती. या अपघातात गाडीचा चालकही जखमी झाला आहे. याप्रकरणी वरळी पोलिसांनी गुन्हा दाखल करून २३ वर्षीय चालकाला अटक केली आहे.

राजलक्ष्मी राजकृष्णन असे महिलेचे नाव आहे. वरळी डेअरीजवळ सकाळी साडेसहाच्या सुमारास ही महिला चालत होती. त्यावेळी तेथे भरधाव वेगाने येणाऱ्या मोटरगाडीवरील चालकाचे नियंत्रण सुटल्यामळे मोटरगाडी या महिलेला धडकली. त्यानंतर गाडी तेथील दुभाजकालाही धडकली. मोटरगाडी महिलेला मागून धडकल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.



त्यामुळे महिला दूरवर फेकली गेली. त्यात त्या गंभीर जखमी झाल्या. स्थानिक आणि पोलिसांच्या मदतीने तिला नायर रुग्णालयात हलवण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्यांची तपासणी करून महिलेला मृत घोषित केले. अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. याप्रकरणी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. सुमेर मर्चंट (२३) असे आरोपी चालकाचे नाव असून तो ताडदेव येथील रहिवासी आहे. त्यालाही अपघातात दुखापत झाली आहे. एका मैत्रीणीला सोडण्यासाठी तो गेला होता. मैत्रीणीला सोडून येताना हा अपघात झाला. त्याला वरळी पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याने दारूचे सेवन केले होते का ते तपासण्यासाठी त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. वरळी सी-फेस परिसरात किनारी मार्गाचे काम सुरू असल्यामुळे तेथे चालण्यासाठी येणाऱ्यांना जागा अपूरी पडते. त्यामुळे अनेकांना समोरील पदथावर व रस्त्यावर जीव मुठीत घेऊन चालावे लागते, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

# पनवेलमध्ये धुमाकूळ घालणारा डिझेलमाफिया ताब्यात

## आता खालापूर परिसरातही हैदोस

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात एकाच दिवशी चार वेगवेगळ्या ठिकाणी गाडीतील डिझेल चोरी करणाऱ्या टोळीतील एकाला पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले असून त्याच्या इतर साथीदारांचा शोध पोलीस करीत आहेत. दरम्यान, पोलिसांनी पनवेल तालुक्यात डिझेलमाफियांविरुद्ध कारवाई सुरू केल्यामुळे त्यांनी आपला मोर्चा रसायनी, चौक, दांड फाटा व खालापूर महामार्गावर असलेल्या हद्दीतील ढाब्यांवर सुरू केला आहे.

पनवेल तालुक्यातील निवृत्ती ईश्वर करांडे हे जे. डब्ल्यु. आर कंपनीजवळ, जेएनपीटी रोडवर त्यांच्या ताब्यातील टाटा कंपनीचा ट्रेलर (एनएल ०१ एबी ७२८७) रस्त्याच्या कडेला बंद व उभी करून गाडीतच झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने गाडीचे डिझेल टॅंकचे लॉक तोडून त्यामधील ६,५८० रुपये किमतीचे ७० लिटर डिझेल चोरून नेले. तर दुसऱ्या घटनेत रूपेश परशुराम भोईर ह्यांनी गाढी नदीच्या पुलावर, टी पॉईंट ते कळंबोली जाणाऱ्या रोडवर १४ चाकी ट्रेलर (एमएच ४६ एएफ ५३२०) पार्क करुन ठेवला असता अज्ञात व्यक्तीने ट्रेलरमधून पाच हजार रुपये किमतीचे ५५ लिटर डिझेल चोरी केले. तसेच तिसऱ्या घटनेत बाकीराव कट्टरवडे यांनी त्यांच्या ताब्यातील अशोक लेयलॅंड कंपनीचा ट्रक (एमएच २३ डब्ल्यु ५०४६) रस्त्याच्या कडेला उभी करुन गाडीतच झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने गाडीचे डिझेल टॅंकचे लॉक तोडून त्यामधील ७,७२० रुपये किमतीचे ८० लिटर चोरून नेले. त्याचप्रमाणे पळस्पे परिसरात सुद्धा एका उभ्या वाहनातून डिझेल चोरीची घटना घडली होती.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिसांकडे दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश दळवी, पोलीस हवालदार अविनाश गंथडे, पोलीस नाईक अमोल पाटील, अशोक राठोड, महेश पाटील, मिथुन भोसले, पोलीस शिपाई विशाल दुधे आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने सापळा रचून अंशू राजेशकुमार चव्हाण (३३, रा.कोपरखैरणे) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक तपास केले असता त्याने त्याच्या साथीदारांसह हि डिझेल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून २१० लिटर डिझेल जप्त केले असून त्याच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

## डिझेलमाफियाने चक्क पोलीस उपनिरीक्षकाला नेले फरफटत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून डिझेल चोरांनी धुमाकूळ घातला आहे. दरम्यान, या डिझलमाफियांची मजल इथपर्यंत गेली आहे की त्यांनी काही दिवसांपूर्वीच चक्क पोलीस उपनिरीक्षकालाच गाडीतून फरफटत नेल्याची घटना घडली आहे, मात्र या जिगरबाज पोलीस अधिकाऱ्याने आपल्या जीवाची तमा न बाळगता आरोपीला गाडीतून खेचून बाहेर काढले.

पनवेल-गोवा महामार्गावरील शिरढोण गावाजवळच्या ढाब्यांजवळ उभ्या असलेल्या ट्रेलर-ट्रक अश्याप्रकारच्या मोठ्या वाहनांमधून डिझेल चोरी होत असल्याच्या तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. त्यानुषंगाने याप्रकरणाचा अधिक तपास करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, पोलीस शिपाई प्रसाद घरत, विवेक पारासूर यांचे पथक रात्रीच्या वेळी तिथे गस्त घालत असताना शिरढोण येथे एका ट्रेलरमधून डिझेल चोरी करत असल्याच्या संशयास्पद हालचाली दिसल्या. त्यांनी तत्काळ गाडीचे हेडलाईट बंद करून गुपचूप त्यांचा पाठलाग केला असता पोलिसांना पाहून आरोपी शेरसिंह राठोड आणि शहाबाज अन्सारी यांनी आपल्या वाहनातून पळायला सुरुवात केली.

या वेळी उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे यांनी धावत जाऊन एका आरोपीला गाडीत बसत असताना पकडण्याचा प्रयत्न केला मात्र गाडी चालकाने गाडी सुरु करून त्यांना काही अंतर फरफटत नेले. यात शिंदे यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली, मात्र त्यांनी जीवाची तमा न बाळगता त्या आरोपीला खेचून खाली पाडले.

या दरम्यान पोलीस शिपाई प्रसाद घरत, विवेक पारासूर यांनी गाडीचा पाठलाग करत गाडी थांबवत दुसऱ्या आरोपीला हि पकडले. दुखापत झालेली असतानाही पोलिसांनी केलेल्या या धाडसी कामगिरीमुळे त्यांचे कौतुक होत आहे.

# भंगाराला आगी लावण्याचे प्रकार वाढले

## साईनगरमधील घटनेमुळे स्थानिकांचे आरोग्य धोक्यात

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल शहरातील कळंबोली-जेएनपीटी मार्गावर असलेल्या भंगार माफियांमुळे टायरसह इतर वस्तू जाळण्याच्या प्रकारामुळे साईनगरवासियांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

कळंबोली-जेएनपीटी मार्गावर असलेल्या महावीर वाटिका इमारतीच्या समोरील भंगार व्यावसायिक टायरमधील तारा गोळा करण्याच्या नादात मोठ्या प्रमाणात टायर रात्रीच्या सुमारास जाळत आहेत. त्यामुळे या परिसरात अतिशय घाणेरडा वास पसरत असून मोठ्या प्रमाणात प्रदुषण निर्माण होत आहे.

दरम्यान, शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास या भंगार व्यावसायिकाने लावलेल्या आगीमुळे परिसरात आग पसरली होती. नागरिकांनी याची माहिती पनवेल शहर पोलीस व अग्निशमन दलाला दिल्यांनतर त्याठिकाणी तत्काळ दाखल होत ही आग विझवली. या भंगारमाफियानांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी येथील नागरिकांनी पनवेल शहर पोलिसांकडे केली आहे.

## तळोजामध्ये रंगली भव्य भजन स्पर्धा

# मनाला स्थिर ठेवण्यासाठी अध्यात्माची जोड आवश्यक -आमदार प्रशांत ठाकूर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भटकत राहणाऱ्या मनाला जर आपल्याला कुठेतरी स्थिर ठेवायचा असेल तर त्याच्यासाठी अध्यात्माची जोड ही आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या ठाणे रायगड जिल्ह्यामध्ये असलेली भजनाची परंपरा हि आपल्या पुढच्या पिढ्यांना योग्य दिशेने मार्गदर्शन करणारी आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी भजन स्पर्धेवेळी केले.

प्रभात पर्व फाऊंडेशनच्या वतीने भव्य भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या भजन स्पर्धेला भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत भजन स्पर्धेचा आस्वाद घेतला. पनवेल तालुक्यातील तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन हॉल येथे ही भजन स्पर्धा रविवारी (दि. १९) झाली.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविणाऱ्या स्पर्धकास २२,२२२ रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकविणाऱ्या स्पर्धकास १२,२२२ रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह तसेच तृतीय क्रमांक पटकविणाऱ्या स्पर्धकास ७,७७७ रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

या वेळी भजनसम्राट हभप निवृत्तीबुवा चौधरी, महादेवबुवा शहाबाजकार, बी. के. राजे, सागर राजे यांच्यासह स्पर्धक व भजनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**पनवेल : येथे द्वारकादास शामकुमार ग्रुपच्या मे. द्वारकादास शामकुमार एक्सक्लुसिव्ह शोरूमच्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांचे हस्ते रविवारी झाले. या वेळी अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील, अभिनेत्री हर्षदा खानविलकर, माधवी निमकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच या कार्यक्रमाला नेहा देशमुख, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, अ‍ॅड. वृशाली वाघमारे, रूचिता लोंढे, प्रिया मुकादम, प्रिती डाके आदी उपस्थित होते.**

## निवडक

### गाड्यांच्या शोरूममध्ये चोरी

**पनवेल :** पळस्पे येथे असलेल्या ट्रू-व्हॅल्यू मारुती सुझुकी शोरूममध्ये अज्ञात चोरट्याने चोरी करून चार लाख रुपये चोरी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. ट्रू-व्हॅल्यू मारुती सुझुकी शोरूममध्ये बंद झाल्यावर मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून शोरूममध्ये असलेल्या दालनात आतील रूममध्ये ठेवलेले चार लाख रुपये रक्कम घेऊन तो पसार झाला आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### पनवेलमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून ठाणे येथे जाऊन येतो असे सांगून



दुचाकी घेऊन घराबाहेर पडलेला इसम घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. नामदेव गंगाराम दळवी असे या बेपत्ता व्यक्तीचे नाव असून त्याचे वय ४१ वर्ष, चेहरा गोल, रंग सावळा, उंची पाच फुट आठ इंच, डोक्याचे केस काळे, डोळे काळे, नाक जाड सरळ, अंगाने जाड, तसेच अंगात पांढरा फुल बाह्याचा शर्ट, निळी जिन्स पॅन्ट व पायात काळे बुट घातलेले आहे. तरी या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार बाबासाहेब शिरसाठ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडू करण्यात आले आहे.

### आरपीएफ जवानामुळे प्रवासी बचावला

**पनवेल :** रेल्वे स्थानकात आरपीएफ जवानाच्या सतर्कतेमुळे चालती ट्रेन पकडण्याच्या नादात खाली पडणाऱ्या प्रवाशाचा जीव बचावला आहे. पनवेल रेल्वे स्थानकात चालती नेत्रावती एक्सप्रेस पकडताना प्रवाशाचा हात सटकला तो खाली पडणार इतक्यात तिथे कर्तव्य बजावत असलेल्या आरपीएफ जवानाने प्रसंगावधान राखत धाव घेत प्रवाशास आठ ढकलून ट्रेनमध्ये टाकले. त्यामुळे त्या प्रवासाचा जीव वाचला आहे. ही संपूर्ण घटना रेल्वे स्थानकाच्या सीसीटीव्ही कॅमेरा कैद झाली आहे.

# भाजप नेते एकनाथ देशेकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा

**पनवेल : रामप्रहर**

भाजप रा. जि. ओबीसी संघटन अध्यक्ष तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य एकनाथ देशेकर यांचा वाढदिवस रविवारी (दि. १९) विविध उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. एकनाथ देशेकर यांनी वाढदिवसानिमित माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भानघर येथील करूणेश्वर वृद्धाश्रमात फळे व कपड्यांचे वाटप केले.

या वेळी सरपंच कमलाताई देशेकर, माजी सरपंच शांताराम पोपेटा, माजी उपसरपंच मंगेश पाटील, रोशन पोपेटा, रवींद्र पाटील, सागर देशेकर, चंद्रकांत देशेकर, गणपत देशेकर, विश्वास म्हात्रे, धनाजी म्हात्रे, संतोष ढोरे आदी उपस्थित होते.

दरम्यान, करुणेश्वर आश्रम भानघर येथे वस्तू वाटप उपक्रमासह, शांतीवन आश्रम येथे कपडे वाटप, आनंद आश्रम वाकडी येथे वस्तू वाटप इत्यादी उपक्रमही एकनाथ देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी आयोजित करण्यात आले होते.



## गुढीपाडवा निमित्त शोभायात्रा

**उरण : बातमीदार**

गुढीपाडवा म्हणजे मराठी वर्षाची सुरुवात. उरणमध्ये मराठी नववर्षाचे स्वागत विविध सांस्कृतिक धार्मिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात केले जाते. याही वर्षी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून ज्येष्ठ नागरिक मंडळ उरण तर्फे सालाबाद प्रमाणे याहीवर्षा गुढी पाडव्यानिमित्त शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.



ही शोभा यात्रा उरण शहरात पेन्शनर्स पार्क येथून गणपती चौक, एन आय हायस्कूल मार्गे परत पेन्शनर्स पार्क या मार्गे काढण्यात येते. विविध सामाजिक संस्था संघटनेचा दरवर्षी शोभा यात्रेत मोठा सहभाग असतो. २२ मार्च २०२३ रोजी सकाळी ८.३० वाजता पेन्शनर्स पार्क, उरण शहर येथून या गुढीपाडवा शोभा यात्रेची सुरुवात होणार आहे. जास्तीत नागरिकांनी विविध सामाजिक संस्था संघटनांनी मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष हसमुख भिंडे (पालू भिंडे), उपाध्यक्ष अरुण मोदी, सचिव उमेश नाईक आदींनी केले आहे.

## रसायनीत राष्ट्रीय स्तरावरील हॅकाथॉन; १४ राज्यांचा सहभाग

**मोहोपाडा : प्रतिनिधी**




(छाया : राकेश खराडे)

रसायनी येथील पिल्लई एचओसी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान रसायनी महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागातर्फे तीन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील हॅकाथॉन हॅकओव्हरफ्लो १.० चे आयोजन करण्यात आले होते. यात भारतातील चौदा राज्यांतील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

हॅकाथॉनचे उद्घाटन अंजनीकुमार ठाकूर (सिएसई-II, गुगल), श्रीधर मानकर यु ट्युब प्रभावक, महात्मा एज्युकेशन सोसायटीचे सिईओ डॉ. वासुदेवन पिल्लई आणि डॉ. जे. डब्ल्यू. बकाल, प्राचार्य पिएचसिईटी यांच्या उपस्थितीने झाले. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटमधील त्यांचे कौशल्य आणि सर्जनशीलता प्रदर्शित करण्यासाठी देशभरातील विद्यार्थ्यांना एकत्र आणणे हा हॅकाथॉनचा उद्देश होता. हॅकाथॉन ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारे आयोजित करण्यात आली होती. ऑफलाइन मोडमध्ये एकूण १५१ संघांची नोंदणी करण्यात आली होती, त्यापैकी ६२ संघांना अंतिम फेरीसाठी निवडण्यात आले होते. ऑनलाइन मोडमध्ये, ४०० हून अधिक संघांनी भाग घेतला होता. रसायनीतील पिल्लई कॅम्पसच्या वतीने तीन दिवसीय हॅकाथॉनची सांगता शनिवारी रसायनीत झाली.

या वेळी चौदा राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांपैकी विजेते घोषित करून त्यांना पारितोषिक देण्यात आले. हा कार्यक्रम डॉ. निवेदिता श्रेयांश पीआरओ एमईएस, अंजनीकुमार ठाकूर, डॉ. योगेश जाधव प्राध्यापक एनएमआयएमएस आणि प्रा. वरुणाक्षी भोजने प्रोफेसर पीसीई आणि डॉ. जे. डब्ल्यू. बकाल प्राचार्य पिएचसिईटी यांच्या उपस्थितीत झाला.

दरम्यान, रसायनी पिल्लईत परराज्यातून हॅकाथॉन स्पर्धेकरिता आलेल्या विद्यार्थ्यांची राहण्याची व इतर व्यवस्था पिल्लई कॉलेजवतीने करण्यात आली होती. याअगोदर पिल्लईच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर हॅकाथॉन स्पर्धेत सन २१ व २२यावर्षी गुवाहाटी व बेंगळोर येथे एक एक लाखाचे दोनवेळा पारितोषिक पटकावले आहे.








**पनवेल : उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या विकास निधी अंतर्गत गुळसुंदे पंचायत समिती विभागातील कोट्यवधींच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. या वेळी भाजप गुळसुंदे जि. प. व पं. स. पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## संपादकीय

# सकारात्मक सरकार

अंदाजपत्रकात महिलांना मोफत प्रवास, एक रुपयात पीक विमा अशा घोषणा केल्या तरी सरकारसमोर आणखी नवे प्रश्न उभे राहत आहेत. या संकटाचा सामना करत शेतकऱ्यांसाठी सकारात्मक भूमिका घेत सरकारने यशस्वी तोडगा काढला आणि शेतकऱ्यांच्या ७० टक्के मागण्या मान्य केल्या.

**आताच्या युतीच्या सरकारमध्ये आणि आधीच्या आघाडी सरकारमध्ये जमिन आसमानाचा फरक आहे. आताचे सरकार हे जनतेसाठी कार्य करत आहे. आधीचे सरकार जनतेला केवळ आश्वासने देत होते. शेताच्या बांधावर जावून फक्त शेतकऱ्यांना बोलण्यात गुंतवत होते, मात्र आताचे सरकार थेट शेतकऱ्यांच्या समस्या सोडवताना दिसत आहे. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार स्थापन होवून अवघे महिने झाले आहेत, मात्र या काही दिवसातच शेतकरी, महिला आणि सामान्य जनतेच्या समस्या सोडवत असल्याचे दिसत आहे. गेल्या काही दिवसात युती सरकारने सर्वसमावेशक असा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या जनतेसमोर मांडला. यामध्ये महिला, शिक्षण आणि सर्वसामान्य जनतेचा विचार करणारा अर्थसंकल्प जाहीर केला. थोडक्यात आजचे सरकार हे सकारात्मक सरकार म्हणून जनतेच्या हृदयात बसले आहे. जनतेचा आजच्या सरकारवर विश्वास दिसून येत आहे. विरोधकांच्या टीका टीप्पणीकडे लक्ष न देता केवळ जनतेच्या समस्यांचा विचार आजचे सरकार करत असल्याचे यावरून स्पष्ट दिसत आहे. आजच्या सरकारवर अनेक संकटे आली. विरोधकांकडून अनेक प्रश्नांचा भडीमार केला मात्र मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी न डगमगता केवळ जनतेचा विचार केला. आजही ते हेच करत आहेत. हे शेतकऱ्यांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयावरून दिसत आहे. नाशिकहून निघालेले हे लाल वादळ विल्होळी येथे दुपारच्या भोजनासाठी विसावल्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन आणि पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांच्या उपस्थितीत आंबे बहुला गावाजवळील एका कक्षात किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत रात्री उशिरापर्यंत चर्चा झाल्यानंतर बहुतांशी मागण्या मान्य करण्यात आल्या. त्यानंतर, किसान सभेने लाँग मार्च स्थगित करण्याचा निर्णय घेतला. बुधवारी रात्री उशिरापर्यंत शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री महाजन यांच्यासोबत किसान सभेचे राष्टीय अध्यक्ष अशोक ढवळे, आमदार जे. पी. गावित, राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाशी चर्चा झाली. सरकार या शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत सकारात्मक विचारविनिमय संबंधित वरिष्ठांशी सुरू होते. या दरम्यान आंबेबहुला गावाजवळ लाँग मार्च दुपारच्या भोजनासाठी विसावल्यानंतर पालकमंत्री गिरीश महाजन, पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी आंदोलकांच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी पाचारण केले. या चर्चेत आमदार जे. पी. गावित, डॉ. अशोक ढवळे, डॉ. अजित नवले यांच्यासह नितीन भोसले सहभागी झाले होते. या वेळी जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी., पोलीस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, ग्रामीण पोलीस अधीक्षक संजय दराडे आदी अधिकारीवर्गही उपस्थित होता. याशिवाय बैठकीच्या वेळी भाजपचे नाशिकमधील तीनही आमदार व काही पदाधिकारी उपस्थित होते. मोर्चेकऱ्यांनी आपल्या विविध मागण्या मंत्रिमहोदयांसमोर ठेवल्या. अखेरीस मुख्यमंत्र्यांशीही झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय किसान सभेच्या वतीने घेण्यात आला. विविध मागण्यांसंबंधी मुख्यमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा झाली आहे. याशिवाय, दर दोन महिन्यांनी या प्रश्नांचा पाठपुरावा केला जाईल, असेही नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.**

# अवकाळीने वीट उत्पादक आणि शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले



**खबरबात**
**विजय मांडे**

हल्ली अवकाळी पाऊस कोणत्याही महिन्यात पडतो. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत होते तसेच वीट उत्पादकांना धडकी भरते. या पावसामुळे हाती आलेल्या कडधान्याचे पीक मातीमोल होते. या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे जगावे कसे? असा प्रश्न त्यांना पडत आहे. जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात हा पाऊस आला की आंबा बागायतदारांना फटका बसतो. या साऱ्या मुळे शेतकऱ्यांची मुले ही बेभरवशाची शेती करण्यास धजावत नाहीत व आपसूकच शहरात येऊन नोकरी करणे पसंत करतात. या अवकाळी पावसाने सर्वसामान्यांनाही फटका बसतो.

आपल्याकडे खरे तर जून ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत पाऊस असतो. अलीकडे तो जुलै महिन्यात सुरू होतो व दिवाळीचा दिवा पाहिल्याशिवाय जात नाही म्हणजे अगदी नोव्हेंबर महिन्यापर्यंत असतो. या सगळ्या बिघडलेल्या हवामानामुळे शेतीचे सारे गणितच बिघडून जाते. एक तर आपल्याकडे भाताचे पीक म्हणजे मुख्य पीक समजले जाते म्हणूनच रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. आता त्यात बदल होत चालला आहे. भात शेती म्हणजे आतबट्याचा व्यवहार असा अनुभव सुद्धा गेल्या काही वर्षांपासून येत आहे. काही भागात दुबार भाताचे पीक घेतात. त्यांनाही या लहरी हवामानाचा नेहमीच फटका बसतो. एकतर राजनाल्याचे पाणी उशिरा सोडले जाते त्यामुळे पीक तयार व्हायला मे अखेर होते आणि नेमका मान्सूनपूर्व पाऊस पडून उभ्या पिकाची नासाडी होते.



वीट उत्पादकांनाही विटांचे उत्पादन करण्यासाठी लहरी हवामानामुळे उशीर होतो. अगदी डिसेंबर महिना उजाडतो. ऐन उत्पादनाच्या वेळी लहरी हवामानाचा फटका बसतो आणि सारी वर पाणी फेरते. त्यातच मजुरांची वानवा त्यामुळे या व्यवसायापासून युवक दूर जाऊ लागले आहेत. असाच प्रकार कडधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाबतीत होतो. पाऊस लांबला की, कडधान्याचे बी पेरण्यासारखी जमीन तयार नसते. जमिनीत पाणी असते. त्यामुळे उन्हाची वाट बघावी लागते. त्यामुळे उशीर होतो. त्यानंतर कडधान्य पेरले जाते. जानेवारी–फेब्रुवारीत पावसाने हजेरी लावली की, कडधान्याची रोपे नुसतीच माजतात त्याचा परिणाम पिकावर होतो. त्यातूनही निभावले तरी वाल, मूग, मटकी, तूर आदींचे पीक काढून घरी आणून उघड्यावर वळविण्यासाठी ठेवले आणि यंदा आला तसा अवकाळी पाऊस आला की घरी आणलेल्या पिकाचीही नासाडी होते. या साऱ्या प्रकारांना शेतकरी वैतागतो. हे सारे डोळ्यांनी पाहिल्यामुळे त्यांची मुले हे सारे करण्यासाठी धजावत नाहीत आणि मग नोकरीसाठी शहराचा मार्ग पत्करतात.



कोंकणात आंबा पीक मुख्य आहे. कर्जत तालुक्यात दोन – अडीच हजार फार्म हाऊस आहेत. त्यातच प्रादेशिक कृषी केंद्र असल्याने तेथे विविध जातीचे भात बियाणे मिळते त्याचप्रमाणे विविध जातींच्या आंब्याची कलमे सुद्धा उपलब्ध असतात. भात पीक किंवा कडधान्य पिकाची गॅरंटी नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी व त्यांच्या मुलांनी आपल्या शेतात आंब्याची कलमे लावली आहेत. या लहरी हवामानाचा फटका त्यालाही बसतो. ऐन मोहोर आल्यावर पावसाने हजेरी लावली किंवा वादळी वारे जरी आले तरी आंब्याचे पीक धोक्यात येऊ शकते. त्यामुळे आंबा बागायतदाराला सुद्धा नेहमीच लहरी हवामानाची भीती असते. एकंदरीत शेतकरी, विट उत्पादक, आंबा बागायतदार यांना लहरी हवामानामुळे पीक घ्यावे की नाही घ्यावे? असा प्रश्न पडत असतो. त्यामुळे निसर्गाच्या हातातच सारे काही असल्याने शेती व्यवसायापासून युवक दूर जात आहेत. हे कटू सत्य आहे.

या अवकाळी पावसाचा फटका व्यवसायिकांसह सर्वसामान्यांनासुद्धा बसतो. लग्नाचे मुहूर्त असतात. दुपारी उकाडा असल्याने लग्न समारंभ गोरज मुहूर्तावर करण्याकडे कल असतो आणि नेमका त्याच वेळी अवकाळी पाऊस धडकतो आणि रंगाचा बेरंग होतो. मंडपाचे नुकसान होते. वऱ्हाडाची पळापळ होते. एप्रिल, मे मध्ये घरांची डागडुजी करण्यात येते. त्यावेळी लहरी हवामानाचा पाऊस आला तर सारेच बिघडते. त्या लोकांना राहायचे कोठे हा प्रश्न पडतो. आपणच निसर्गाचा समतोल बिघडवतो त्यामुळे निसर्गही आपले जीवन विस्कळीत करणारच यात शंका नाही. करावे तसे भरावे असेच म्हणावे लागेल.

## बदलते तंत्रज्ञान

# आता 'या' ॲप्ससाठी करता येणार एआय फीचर्सचा वापर




आपल्याला कोणतीही माहिती हवी असेल तर आपण सर्वप्रथम गुगलची (Goggle)मदत घेतो. गुगल या सर्च इंजिनची (Search Engine) सुरुवात ४ सप्टेंबर १९९८ रोजी झाली. अल्फाबेट या कंपनीच्या अंतर्गत गुगलचा समावेश होतो. गुगलची भारत ही मोठी बाजारपेठ आहे. हजारो वापरकर्ते याचा वापर करतात. गुगल नेहमीच त्याच्या वापरकर्त्यांसाठी नवनवीन फिचर, अपडेट आणत असतो. याचा फायदा वापरकर्ते घेत असतात. याच google ने आता आपल्या Google Docs, Gmail, Sheets, Slides, Meet आणि Chat यासह त्याच्या वर्कस्पेस ॲप्ससाठी नवीन जनरेटीव्ह AI फीचर्सची घोषणा केली आहे.

नवीन AI फीचर्ससह वापरकर्ते आपल्या जीमेलचे कॉन्ट्रॅक्ट तयार करणे, मेलला उत्तर देणे यासाठी सक्षम असणार आहे. तसेच गुगल डॉक्समध्ये वापरकर्त्यांना विचार करणे, प्रूफरिडींग करणे अणि लिखाण देखील करता येणार आहे. त्या शिवाय गुगल शीट्समध्ये वापरकर्ते रॉ डेटापासून विश्लेषण करू शकणार आहेत. तर गुगल चशशीं मध्ये नोट्स मिळवणे आणि नवीन बॅकग्राऊंड जनरेट करू शकतील. चॅटमध्ये AI फीचर्स वापरकर्त्यांसाठी काम करण्यासाठी कार्यप्रवाह अधिक सक्षम करतील.

आम्ही या महिन्यामध्ये आमच्या प्रोग्रॅमच्या माध्यमातून हे नवीन फीचर्स लॉन्च करू. ज्याची सुरुवात अमेरिकेमध्ये इंग्रजीमधून होईल. तेथून आम्ही अधिक देशांमध्ये आणि भाषांमध्ये वापरकर्त्यांना, लहान व्यवसायांना, उद्योगांना आणि शिक्षण संस्थांना अधिक व्यापकपणे उपलब्ध करून देण्याआधी अनुभवाची पुनरावृत्ती करू, असे गुगलने एका ब्लॉगपोस्टमध्ये म्हटले आहे.

दरम्यान, गुगलने घोषणा केलेल्या या फिचरमुळे वापरकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

# चिवचिवाट करणारी चिऊताई

**निमित्त**



मुंबईसारख्या महानगरांत चिमण्यांच्या चिवचिवाटाने सुरू होणारा दिवस अलीकडे फारसा अनुभवता येत नाही. चिमणी – आपल्या सगळ्यांच्या परिचयाची.. कदाचित अतिपरिचयाची. आज चिमण्यांची संख्या कमी झालेली दिसते. खरं म्हणजे भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा, माणसाच्या जवळपास राहणारा आणि त्यामुळे नेहमी दिसणारा पक्षी अशी चिमणीची ओळख आहे. परंतु आता तिच्यासाठी अंगण नाही, झाडं नाहीत, वळचणी नाहीत आणि आपल्या घरांमध्ये तिच्या घरटय़ासाठी छोटीशी जागाही नाही. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या काळात चिमण्या मारण्याचे अभियान सुरू झाले होते, परंतु त्यामुळे पर्यावरणापुढे उभे राहू शकणारे धोके लक्षात आले. त्यानंतर अनेक वर्षांनी जगभरच, तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती 'चिमणी जगायला हवी' याची जाणीव होऊन २०१० पासून २० मार्च हा दिवस 'जागतिक चिमणी दिवस' म्हणून साजरा केला जातो.

भारतात नाशिक येथील 'नेचर फॉरएव्हर सोसायटी'चे संस्थापक आणि निसर्गरक्षक मोहम्मद दिलावर आणि फ्रान्समधील 'इकोसिस ॲक्शन फाऊंडेशन' या संस्थांनी, इतर स्वयंसेवी संस्थांसह – चिमण्या कमी होण्याची कारणे शोधण्यासाठी अभ्यास केला. चिमण्यांना मदत करण्यास सुरुवात केली आणि चिमण्यांची कमी होणारी संख्या हा वातावरणातील वाढत्या प्रदूषणाचा परिणाम आहे काय, हे तपासून पाहण्यासाठी जगभर चळवळ उभारली.

'जागतिक चिमणी दिन' या दिवशी लोकांमध्ये चिमणी वाचविण्यासाठीची जागृती करणे, तिचे अन्नसाखळीतील– पर्यायाने पर्यावरणातील महत्त्व समजावणे, चिमणीला जगण्यासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण करणे अशा प्रकारचे कार्यक्रम वैयक्तिक अगर संस्था पातळीवर आयोजित केले जातात, परंतु चिमणीसाठीच्या जनजागृतीची गरज कायमस्वरूपी आहे. कमी होणारी झाडे, माणसाच्या बदललेल्या खाण्याच्या सवयी, वाढते आधुनिकीकरण, गगनचुंबी इमारतींत होणारी वाढ, मोबाइल फोन टॉवर्स या सर्व गोष्टींमुळे चिमणी अडचणीत आली आहे. चिमणीला बाभळीसारख्या नैसर्गिक अधिवासाबरोबरच घरटे बांधण्यास अनुकूल गोष्टी उपलब्ध करून देणे, घराभोवती शक्य असल्यास छोटी झाडेझुडुपे लावणे, आपल्या घराजवळ, बाहेर चिऊताईसाठी दाणा–पाणी ठेवणे अशा गोष्टी प्रत्येक जण करू शकतो.

**–डॉ. निलिमा कुलकर्णी**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : ओले काजूगर कोकणातल्या शहरातील स्थानिक बाजारपेठेत दाखल झाले आहेत. ओले काजू विक्रीला आणणारी कातकरी मंडळी ओल्या काजूचे तीन वाटे १०० रुपयांना देतात.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# लिंबूपाणी पिताना घ्या काळजी नाहीतर होतील 'हे' आजार

लिंबू पाणी प्यायल्याने झटपट उर्जा मिळते आणि उष्णतेपासून काही प्रमाणात आराम मिळतो यात शंका नाही, पण जर तुम्ही याचे अति प्रमाणात सेवन केले तर शरीरावर अनेक वाईट परिणाम होऊ शकतात.

लिंबू व्हिटॅमिन सीचा एक चांगला स्रोत मानला जातो, जो शरीरातील इतर रोगांशी लढण्यास मदत करतो. मात्र कोणत्याही गोष्टीचे जास्त सेवन करणे धोकादायक आहे. लिंबू पाण्याचे जास्त सेवन केल्याने तुमच्या शरीरावर किती वाईट परिणाम होऊ शकतात हे जाणून घेऊया.



**जास्त लिंबू पाणी पिण्यामुळे होणारे नुकसान**

✻ **पोटाचे आजार :** रिकाम्या पोटी लिंबूपाणी मधात मिसळून प्यायल्याने पचनास खूप मदत होते. तथापि, जास्त प्रमाणात लिंबू पाण्याचे सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते आणि पचन प्रक्रिया देखील मंद होऊ शकते, ज्यामुळे पोटदुखीच्या तक्रारी होऊ शकतात.

✻ **डिहायड्रेशन प्रॉब्लेम :** लिंबू पाणी शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. पण तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की जास्त प्रमाणात लिंबू पाणी प्यायल्याने तुमचे ब्लॅडर फुगू शकते, याचा अर्थ तुम्हाला वारंवार बाथरूमला जावे लागेल. शरीरातून जास्त पाणी कमी झाल्यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. यामुळेच लिंबू पाणी प्यायल्यानंतर भरपूर पाणी प्या, जेणेकरून डिहायड्रेशन होणार नाही.

✻ **दात किडणे :** लिंबाचा रस खूप आम्लयुक्त अर्थात सिडीक असतो आणि तो जास्त प्रमाणात प्यायल्याने दातांना झिणझिण्या येऊ शकतात. तसेच वेळेनुसार, या झिणझिण्या वाढू शकतात, ज्यामुळे दात किडतात. तुम्हाला तुमच्या दातांमध्ये संवेदनशीलतेची समस्या असल्यास, तुम्ही लिंबासारख्या नैसर्गिकरित्या आम्लयुक्त पदार्थांचे सेवन मर्यादित केले पाहिजे.

✻ **केस होतात खराब :** लिंबाचा केसांवरही वाईट परिणाम होतो. लिंबू थेट केसांना लावल्याने वाईट परिणाम होऊ शकतात. यामुळे तुमचे केस कोरडे होऊ शकतात आणि अकाली पांढरे होऊ शकतात. लिंबामध्ये सिडीक अर्थात अम्लीय गुणधर्म असतात, जे तुमच्या केसांचे पोषण चोरू शकतात. म्हणूनच केसांना थेट लिंबू लावणे टाळावे.

✻ **मायग्रेन :** मायग्रेनच्या समस्येमुळे त्रस्त असलेल्यांनी नेहमी लिंबाचे जास्त सेवन करणे टाळावे. लिंबू आणि इतर लिंबूवर्गीय फळांमुळे मायग्रेनची गंभीर समस्या उद्भवते.

# काशिद समुद्र किनाऱ्यावर बंदोबस्त

## ■ पर्यटक पाण्यात बुडू नये यासाठी प्रशासन सज्ज
## ■ मुरुड पोलीस ठाण्यामार्फत विविध उपाययोजना



**..तरच घटनांना आळा बसेल**

**मुरुड पोलीस ठाण्यामार्फत या विविध उपाय योजना काशीद समुद्र किनाऱयासाठी करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये अजूनही काही बदल करून पर्यटकांना आणखीन काही उपाययोजना देण्याचा मानस मुरुड पोलीस ठाणे मार्फत व्यक्त करण्यात आला आहे. पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांनी स्वतची काळजी स्वत: घेऊन पोहण्यापासून दूर राहिल्यास काशीद समुद्र किनारी बुडण्याच्या घटनांना आळा बसणार आहे.**

**मुरुड : प्रतिनिधी**

आतापर्यंत काशीद समुद्र किनारी शेकडो जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर पर्यटक पाण्यात बुडू नये यासाठी प्रशासन सज्ज झाले असून मुरुड पोलिस ठाण्यामार्फत विविध उपाययोजन करण्यात येत आहेत. यासाठी पर्यटक आणि स्थानिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

मुरुड तालुक्यातील काशीद हे पर्यटन स्थळ आंतराष्ट्रीय स्तरावरील आहे. येथे सर्वाधिक पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात.वर्षाला सात लाखापेक्षा जास्त पर्यटक या ठिकाणी भेटी देत असतात. पर्यटकांच्या आगमनामुळे येथे स्थानिकांना चांगलाच रोजगार प्राप्त झाला आहे. हॉटेल लॉजिंग व सर्व विविध सेवा पुरविणाऱ्या टपऱ्या सुद्धा व्यवसाय प्राप्त झाला आहे. परंतु या पर्यटन स्थळाला पर्यटक पाण्यात बुडत असल्याने मोठी समस्या निर्माण झाली असून काशीद या पर्यटन स्थळाचे नाव बदनाम होत आहे.

आतापर्यंत काशीद समुद्र किनारी शेकडो जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. नवीन येणाऱ्या पर्यटकांना समुद्रातील पाण्याचा अंदाज नसल्याने थेट पाण्यात उतरतात. तसेच काही जण मद्यपान करून खूप खोलवर उत्सहाच्या भारत जातात. दम लागल्याने किनारा गाठता येत नाही. येथील पाण्यात बुडण्याच्या घटना कमी घडाव्यात यासाठी रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रकाश सकपाळ व पोलिस नाईक सागर रसाळ यांनी काशिद, मुरुड, राजपुरी समुद्रकिनारी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी अनेक उपाययोजना तयार केल्या आहेत.

काशीद किनाऱ्यावर १० मीटर नंतर खोल समुद्र सुरु होतो. लाटांसोबत पायाखालील वाळू अचानक सरकते व पर्यटक समुद्रात ओढला जातो म्हणून त्या परिसरात पर्यटकांनी सतर्क राहाणे गरजेचे आहे. पाण्याचा अंदाज व भरती ओहोटीची वेळ न पाहता, पोहण्यासाठी उतरतात आणि दुर्घटना घडतात. अशा दुर्घटना घडू नये यासाठी पोलिस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांनी दोन पोलिस शिपाई या ठिकाणी तैनात केले आहेत. पर्यटकांचे स्वागत करुन काशिद समुद्राची नैसर्गिक रचना कशी आहे याची संपूर्ण माहिती पर्यटकांना दिली जाते.पर्यटकांनी आततायीपण करु नये यासह विविध सूचना पोलीस देतात. पर्यटक किंवा शालेय विद्यार्थी, शिक्षक यांची सहल काशीद बीच येथे आल्यावर पोलीस त्यांची माहिती रजिस्टरमध्ये नोंद करतात. धोक्याच्यावेळी इशारा म्हणून सायरनचा इशारा दिला जातो. लाऊड स्पीकरद्वारे पर्यटक शालेय विद्यार्थी शिक्षक यांना समुद्राच्या पाण्यात जाऊ नये याबाबत वारंवार सूचना दिल्या जातात. वयोवृध्द नागरिक, महिला, बालके हे गर्दीच्या ठिकाणी हरवल्यास त्यांना लाऊस्पिकरद्वारे जलद माहिती देण्यात येते. बीच व रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. लाईफगार्ड यांची नेमणूक केली असून, रेस्क्यू बोटींचा वापर केला जातो. धोक्यांविषयी सूचना फलक लावण्यात आले आहेत. बॉल, रिंग बॉय, रस्सी, लाईफ जॅकेट इत्यादी साधन सामुग्री उपलब्ध करून ठेवली आहे. वाहन पार्किंग, नो सेफ झोन असे बॅनर्स लावण्यात आले आहेत. पर्यटकांनी सूचनांचे पालन केले तर समुद्रकिनारावर कोणतीही दुर्घटना घडणार नाही, असा विश्वास मुरूड पोलिस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांनी व्यक्त केला आहे.

# मांगुर मत्स्य व्यावसायिकांना महावितरणाचा शॉक

## पंपाचा विद्युत पुरवठा नोटीस देऊन खंडित



**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यात बेकायदेशीरपणे चालणाऱ्या मांगुर मत्स्य पालन व्यवसायावर महावितरण विभागाने देखील कारवाईचा बडगा उचलला असून पंपाचा विद्युत पुरवठा नोटीस देऊन खंडित करण्यात येत आहे.

राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या आदेशानुसार मांगुर प्रजनन, मत्स्यपालन, वाहतुक व विक्री करण्यावर बंदी घातली असून, प्रतिबंधित मागूर माशांचे अस्तित्वात असलेले मत्स्यसाठे नष्ट करण्याचे निर्देश असताना देखील खालापूर तालुक्यात महड, कुंभिवली, चौक हद्दीत कोपरी गाव,पौध, माजगाव, मोहपाडा आणि खालापूर येथे मोठ्या प्रमाणात नदी किनारी तलाव राजरोस सुरू आहेत.

मांगुर मत्स्यपालनाविषयी वाढत्या तक्रारीनंतर प्रशासन मांगुर व्यावसायिकांच्या मागे हात धुवून लागले आहेत. मत्स्य विभाग रायगडने तालुक्यातून पस्तीस टन मासा जप्त करून नष्ट केला. तर काही दिवसापूर्वी पाटबंधारे विभागाने देखील पाताळगंगा नदीतून बेकादेशीरपणे पाणी उपसा करणारे पंप जप्त केले होते. मांगुर व्यावसायिकांवर महावितरणची देखील वक्रदृष्टी झाली असून, बेकायदशीर विद्युत जोडणी खंडित करण्याचे काम महावितरण विभागाने हाती घेतले आहे. महावितरण विभागाच्या कारवाईमुळे मांगुर व्यावसायिकांची तडफड होणार आहे. महावितरण विभागाने कारवाईत सातत्य ठेवल्यास मांगुर व्यावसायिकांचा बाजार खालापूर तालुक्यातील उठणार आहे.

**पाटबंधारे विभागाकडून मिळालेल्या यादीनुसार तलावासाठी घेण्यात आलेला बेकायदेशीर विद्युत पुरवठा खंडित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सावरोली आणि धामणी भागात पाच व्यावसायिकांवर कारवाई करणार आहोत. महड मांगुर तलाव परिसर खोपोली शिळफाटा महावितरण विभागाकडे आहे. त्यामुळे महड येथील कारवाईबाबत तपशील नाही.**

**–सचिन धनुधर्मी, अभियंता, महावितरण कार्यालय खालापूर**

### प्रशासनाची कारवाई

मांगुर तलाव प्रश्नावर अप्पर जिल्हा दंडाधिकारी डॉक्टर पद्मश्री बैनाडे यांनी आदेश दिल्यानंतर आणि संजय पाटील सहाय्यक आयुक्त मत्स्य विभाग रायगड यांनी पदभार स्विकारल्यापासून कारवाईला वेग आला आहे. त्यानंतर पाटबंधारे विभाग कर्जत, पोलीस विभाग आणि महावितरण यांनी संयुक्त कारवाई करत महड, हाळ भागात पंपमोटर जप्ती कारवाई केली होती.

### नागरिकांमध्ये संताप

तालुक्यातील चौक, कोपरी पौध, माजगाव, मोहपाडा, महड, कुंभिवली, हाळ भागात मांगुर तलाव कित्येक एकरमध्ये असून सर्वाधिक तलाव तिर्थक्षेत्र असलेला महड परिसरात आहे. या ठिकाणी मेलेले मासे जाळणे तसेच मांगुर माशांसाठी खाद्य म्हणून सडलेलं मांस यामुळे हा परिसर कायम दुर्गंधी भरलेला असतो. नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संताप आहे.

# हेमाताई मानकर यांनी केला लाल परीने सवलतीत प्रवास

## अर्थमंत्री देवेंद्र फडणीस यांचे मानले आभार

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजपाच्या महिला मोर्चाच्या रायगड जिल्हा अध्यक्षा हेमाताई मानकर यांनी नुकताच लाल परीने प्रवास केला. महिलांसाठी एसटीमध्ये असलेल्या ५० टक्के सवलतीचा लाभही त्यांनी यावेळी घेतला. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार मानले .



दरम्यान राज्याच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री यांनी एसटी बसमधून सरसकट महिलांना तिकिटात ५० टक्के सवलत देण्याचे शिंदे फडणवीस सरकारने जाहीर केले होते. त्यानंतर त्याची अंमलबजावणी शनिवारपासून झाली. या सवलतीचा रायगड जिल्ह्यातील असंख्य महिलांनी फायदा घेतला.

शनिवार सकाळी हेमाताई मानकर या आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन इंदापूर बस स्थानकातून तळा येथे व तळा येथून इंदापूरमार्गे माणगावपर्यंत लाल परीने सवलतीच्याने प्रवास केला. या प्रवासादरम्यान गाडीतील इतर महिलांशी चर्चाही मानकर यांनी केली. या ५० टक्के मुळे होणारा फायदा गाडीतील इतर स्त्रिया सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

रायगड जिल्हा महिला अध्यक्ष हेमाताई मानकर, तळा तालुका सरचिटणीस नीलिमा मुंडे, तळा तालुका शहर अध्यक्ष सुनिता चोरखे, उपाध्यक्ष शोभा मोरे, प्रमिला चोरगे प्रवासादरम्यान सोबत होत्या.

# निवडणुका लांबल्याने इच्छुकांची घालमेल

**खोपोली : प्रतिनिधी**

सत्तासंघर्ष बाबतचा सुप्रीम कोर्टाचा येऊ घातलेला निर्णय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील ओबीसी आरक्षण बाबतचा तिढा या सर्व घडामोडीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याबाबत अनिश्चित स्थिती बनली आहे.

**पक्ष प्रवेशही टांगणीला**

रायगड जिल्ह्यातील सहा नगरपालिका व जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणूका दीड वर्षांपासून प्रतीक्षेत आहेत.दरम्यान निवडणुका बाबत कोणतीही चर्चा राज्य सरकार कडून होत नसून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पुन्हा लांबणीवर पडल्याची शक्यता निर्माण झाली असल्याने इच्छुकांची घालमेल वाढत आहे. दुसरीकडे निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर होणारे पक्ष प्रवेशही टांगणीला लागले असून राजकीय क्षेत्रात अनिश्चितेची स्थिती वाढली आहे.

रायगड जिल्ह्यात खोपोली पालिकासह अन्य सहा पालिका व जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूका दीड वर्षांपासून प्रतीक्षेत आहेत. मधल्या काळात कधीही निवडणूका जाहीर होतील अशी स्थिती निर्माण झाली होती. त्या दृष्टीने सर्व राजकीय पक्षांनी जोरदार मोर्चे बांधणीही सुरू केली होती. अन्य राजकीय पक्षांतील वजनदार नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात आणण्यासाठीही चढाओढ सुरू झाली होती. मात्र सत्ता संघर्षाबाबत सुप्रीम कोर्टातील युक्तीवाद नुकताच संपून आत्ता एक दीड महिन्यात निर्णय लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हा निर्णय कोणाच्या बाजूने लागेल त्यावर महाराष्ट्र राज्यातील राजकीय वातावरण तयार होणार आहे. अशा अस्थिरतेच्या स्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मान्सून हंगामापूर्वी होण्याची शक्यता जवळपास मावळली आहे. त्यामुळे या निवडणुका आत्ता ऑक्टोबर नंतरच होतील असे संकेत मिळत आहेत.

एक वर्षाहून अधिक काळ इच्छुक तयारीला लागले असून वर्तमान स्थितीत कार्यकर्त्यांना सांभाळणे व संभाव्य उमेदवार म्हणून अन्य खर्च सुरूच असल्याने इच्छुकांची प्रचंड दमछाक होत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिवसेना शिंदे गटात प्रवेश करू पाहणाऱ्या संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामुळे महाआघाडीच्या गोटात चिंतेचे वातावरण पाहावयास मिळत आहे. न्यायालयाचा निकाल आमच्या बाजूने लागेल असा विश्वास महायुतीच्या कार्यकर्त्यांना वाटतो. निवडणुका लागल्या तरी राज्यात विद्यमान सरकारच सत्तेवर असणार आहे असा कार्यकर्त्यांकडून दावा केला जात आहे.

# मिसबाह शेखचे नीट परीक्षेत यश

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन-ए-इस्लाम जंजीरा हायस्कूल व जूनिअर कॉलेजची विद्यार्थिनी मिसबाह सिराज शेख हिने नीट परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवून संपूर्ण देशातून १५० वा क्रमांक मिळवला आहे.



मिसबाह हिने दंत वैद्यकीय क्षेत्रातील बी.डी.एस.पदवी घेतल्यानंतर पुढील शिक्षण एम.डी. एस.घेण्यासाठी नीट पीजी परीक्षा द्यावी लागते. या नीट परीक्षेत तिने उज्ज्वल यश प्राप्त करून देशातून १५० वा क्रमांक घेऊन सर्वांचे लक्ष वेधले आहे.

ती आता एमडीएससाठी पात्र ठरली असून शासकीय विद्यालयात तिला सहज प्रवेश मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य गुणवत्ता यादी अजून येणे बाकी आहे. मिसबाह ही अंजुमन इस्लाम जंजिरा प्राथमिक शाळा, मुरूड, जंजिराची पहिल्या बॅचची विद्यार्थिनी आहे. जिने सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनीचा किताब पटकावला होता आणि मिसबाहच्या हायस्कूलपर्यंत अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल, मरूडमध्ये सर्वोत्कृष्ट मुलीचा पुरस्कारही मिळाला आहे. अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूलमध्ये मिसबाहने एसएससी परीक्षेत ९३ टक्के गुण मिळवून अंजुमन हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे सर्व रेकॉर्ड मोडले. मिस्बाहने जेएटी हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, मालेगावमधून बारावी उत्तीर्ण झाली. मिसबाहचे वडील सिराज शेख हे अंजुमन हायस्कूल येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते मुरुड तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष म्हणून प्रामाणिक काम करीत आहेत.

# कर्जतच्या अभिनव ज्ञान मंदिर शाळेचे माजी विद्यार्थी तबल ४८ वर्षानंतर एकत्र



***जुन्या आठवणींना उजाळा***

***दुपारच्या सत्रात कराओके म्युझिक सिस्टीमवर संजय वाघमारे यांनी१९६० ते १९७५ च्या काळातील चित्रपटांतील गाणी सादर करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. अरुण गुरव यांनी 'ही चाल तुरु तुरु...., गीत सादर करून शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची आठवण करून दिली.***

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतच्या अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेमध्ये १९७५ साली अकरावी मॅट्रिकला असणाऱ्या विद्यार्थ्यांचे गेट टुगेदर आयोजित केले होते. या गेटटुगेदरला आलेले काही माजी विद्यार्थी तब्बल अठ्ठेचाळीस वर्षांनी म्हणजे चार तपांनी एकमेकांना भेटले त्यावेळी शालेय मित्रांचे चेहरे शोधण्यातच त्यांचा अर्धा दिवस गेला मात्र उर्वरित वेळात त्यांनी सारे काही विसरून जुन्या आठवणींना उजाळा देऊन धमाल केली.

१९७५ साली अकरावीला म्हणजे जुन्या मॅट्रिकला असलेल्या माजीविद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा तालुक्यातील पोसरी येथील वसंत फार्म हाऊस मध्ये सकाळी दहा वाजल्या पासून आयोजित करण्यात आला होता. दहा वर्षां पूर्वी सर्वच माजी विद्यार्थ्यांसाठी महा स्नेह मेळाव्याचे आयोजन करून संस्थेला भरीव आर्थिक मदत करण्यात आली होती. गेल्या वर्षीही काही मित्र जमून धमाल केली होती. त्यावेळी काही माजी विद्यार्थ्यांना आपल्या रोजच्या व्यापा मुळे मेळाव्यांना उपस्थित रहाता आले नव्हते. यावेळी बहुतांश मित्र निवृत्त झाल्याने ते आवर्जून उपस्थित होते.

सुरुवातीला आयोजक असलेल्या मित्रांपैकी अरुण गुरव यांनी सर्वांचे मनः पूर्वक स्वागत केले. यावेळी व्यासपीठावर धनंजय चाचड, बाळू तवळे, तानाजी बैलमारे, प्रभाकर खैरनार, अरुण गुरव, विजय मांडे आदी उपस्थित होते. प्रत्येकाने आपला परिचय करून देतांना जीवनातील बऱ्या-वाईट प्रसंगांची माहिती मनमोकळेपणे सांगून उपस्थितांच्या हृदयाचा ठाव घेतला. सर्वांनी मिळून गप्पा मारत सहभोजन केले.

पुढील स्नेहमेळावा वर्ग मैत्रिणींसह आयोजित करण्याचे ठरले आणि उद्योजक मित्र असलेल्या हेमंत तथा नंदू डोंबे यांनी त्याचे आयोजन करण्याची तयारी दर्शविली. तसेच २०२५ साली पन्नास वर्षे होत असल्याने त्याच्या आयोजनाचीही चर्चा करण्यात आली. सायंकाळी चहापानानंतर स्नेह मेळाव्याचा समारोप करण्यात आला. प्रभाकर खैरनार यांनी आभार प्रदर्शन केले.

या प्रसंगी रवींद्र खराडे, गजानन काळे, जयंत लेले, विनायक भागवत, सुहास लेले. संजय परदेशी, बिपीन गडकरी, दिगंबर कांबळे, वासुदेव बैलमारे, केशव बडेकर, राजेंद्र दानवे, दीपक वैद्य, शेखर शेजवलकर, सुहास खाडे, विद्याधर गुजराथी, तानाजी घाडगे, शेखर कशेळीकर, बाळू थोरवे, गजानन बडेकर, जगन्नाथ जाधव, गोपीनाथ देशमुख, शिवा भालेराव आदींसह बहुसंख्य वर्गमित्र उपस्थित होते.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost In Lakh | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-10/23-24/ **RFx No. 7000026365** | Utilization of Crane Service at 400 kV R.S. Nagothane S/S, 220 kV IPCL S/S & 220 KV SPCL S/S under 400 KV R.S. (O&M) Division, Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel. **1st Ext.** | Limited to Rs. 5 Lakh | 25.03.2023 up to 16:00 Hrs. |

**EMD:** Rs. 5,000/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635 e-mail ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट- http://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/साबां/२३३३/२०२२-२३ दिनांक : १७/०३/२०२३

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ११६/२०२२-२३**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तरीय अंतर्गत प्रस्तावित कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील २ कामे करणेसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई- निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. २०/०३/२०२३ ते दि. ०३/०४/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि.०५/०४/२०२३ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(योगेश गोडसे)**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/ Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-03/23-24/ **RFx No. 7000026747** | Hiring of LMV (e.g. Swift Dezire/Ascent/Eartiga or likewise) with AC along with Driver and Fuel for Executive Engineer, 400 KV R.S. (O&M) Division, Nagothane | Rs. 5,98,856/- | 25.03.23 up to 16:00 Hrs |
| 2 | e-Tender-04/23-24/ **RFx No. 7000026753** | Hiring of LMV (e.g. Tata Sumo/Mahindra Bolero or Similar) towards 400 KV Line Main. Sub-Division, Nagothane for 2023-24 | Rs. 5,99,766/- | 25.03.23 up to 16:00 Hrs |
| 3 | e-Tender-05/23-24/ **RFx No. 7000026754** | Hiring of MMV (i.e. Mahindra Bolero Camper or Pickup) for Movement of Officers for Supervision/Official Work for Maintenance & Testing Unit under 400 KV R.S. Nagothane Division for 2023-24 | Rs. 5,99,555/- | 25.03.23 up to 16:00 Hrs |
| 4 | e-Tender-06/23-24/ **RFx No. 7000026755** | Hiring of MMV (e.g. Tata 407 or Mahindra Pickup or likewise) towards 400 KV Line Main. Sub-Division, Nagothane under 400 KV R.S. Nagothane Division for 2023-24 | Rs. 5,99,923/- | 25.03.23 up to 16:00 Hrs |
| 5 | e-Tender-07/23-24/ **RFx No. 7000026756** | Hiring of LMV (e.g. Eartiga/ Innova or likewise) for School going Children 7 Seater from Kansai Colony to Nagothane at 400 kV Nagothane s/s under 400 KV R.S. Nagothane for 2023-24 | Rs. 5,95,143.19 | 25.03.23 up to 16:00 Hrs |
| 6 | e-Tender-08/23-24/ **RFx No. 7000026757** | Providing 14 No of Skilled Labour (ITI Certified Technicians in Electrical/ Wireman Trade) for field work under 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for 2023-24 | Rs. 40,17,876/- | 25.03.23 up to 16:00 Hrs |
| 7 | e-Tender-09/23-24/ **RFx No. 7000026758** | Work of Providing Unskilled (Peon – 2 no.) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for the financial year 2023-24 | Rs. 4,97,759/- | 25.03.23 up to 16:00 Hrs |

**EMD:** 1% of Estimate Amount for Sr. No. 1 to 6 and Rs. 5000/- for Serial No. 7 **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers/contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**

# ऐरोली काटई परिसर होणार सुरक्षित

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बांधणार टेकडीलगत संरक्षक भिंत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ऐरोली काटई नाक्यादरम्यानच्या टेकडीचा परिसर आणि ऐरोली काटई नाका उन्नत रस्त्यावरील प्रवास सुरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे. येथील टेकडीवरून भूस्खलन होण्याचा धोका असून हा धोका टाळण्यासाठी टेकडीलगत संरक्षक भिंत बांधण्यात येणार आहे.

'एमएमआरडीए'ने नवी मुंबई आणि डोंबिवलीदरम्यानचे अंतर कमी करण्यासाठी १२.३० किमी लांबीच्या ऐरोली – काटई नाका उन्नत मार्गाचे काम हाती घेतले आहे. ऐरोली – डोंबिवलीमधील अंतर थेट १० किमीने कमी करणाऱ्या या प्रकल्पाचे काम तीन टप्प्यात करण्यात येत आहे. ऐरोली – काटई प्रकल्प पूर्ण झाल्यास नवी मुंबई – डोंबिवली प्रवास केवळ १५ मिनिटांत पार करता येणार आहे.



या प्रकल्पामुळे नवी मुंबई – डोंबिवली प्रवास वेगवान होणार आहे, पण त्याचवेळी हा प्रवास सुरक्षित करण्याचे आवाहन एमएमआरडीएसमोर होते. या मार्गादरम्यान एक टेकडी असून पावसाळ्यात ही टेकडी धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. भूस्खलनामुळे मोठी दुर्घटना घडण्याचीही भीती आहे. या पार्श्वभूमीवर एमएमआरडीएने पश्चिम द्रुतगती मार्गावरील बाणडोंगरी परिसरातील टेकडीदरम्यान संरक्षक भिंत उभारली आहे. तशीच संरक्षक भिंत येथे उभारण्यात येणार असल्याचे 'एमएमआरडीए'मधील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

यासंबंधीच्या प्रस्तावाला प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने मंजुरी दिली आहे.

### प्रवासी वर्गाला मोठा दिलासा

*या संरक्षक भिंतीमुळे टेकडीचा परिसर आणि ऐरोली काटई नाका उन्नत रस्त्यावरील प्रवास सुरक्षित होणार आहे. त्यामुळे हा निर्णय प्रवाशांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे.*

आता लवकरच या निर्णयाची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. या कामासाठी अंदाजे ७३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तर हे काम नऊ महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे.

दरम्यान, राज्यात नव्याने स्थापन झालेले शिंदे-फडणवीस हे जनेच्या हिताचे निर्णय घेत आहेत. या सरकारच्या दमदार कामगिरीमुळे अनेक मोठे प्रकल्प मार्गी लागत आहेत. नागरी समस्या सोडविण्याकडे या सरकारचा कल अधिक असल्याने विविध विकासकामांना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर ऐरोली काटई नाक्यादरम्यानच्या टेकडीचा परिसर आणि ऐरोली काटई नाका उन्नत रस्त्यावरील प्रवास सुरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनामार्फत या मार्गावरील टेकडीलगत संरक्षक भिंत बांधण्यात येणार आहे. यामुळे येथून प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# राज्यस्तरीय गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण परीक्षेत नवी मुंबई पोलिसांचे सुयश



**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य पोलीस दल अधिक अलर्ट आणि सक्षम झालेले आहे. कायदा आणि सुव्यवस्थेबरोबरच गुन्हे प्रगटीकरण करून गुन्हेगारीला आळा बसवण्याचे प्रथम कर्तव्य खाकी वर्दीला बजावावे लागते. सखोल तपास, तांत्रिक दुवे तसेच माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर करून कशा पद्धतीने गुन्हे अन्वेषण करायचे याकरीता राज्यभरातील पोलिसांना गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक येथे दोन आठवड्यांचे प्रशिक्षण दिले जाते. नुकत्याच पार पडलेल्या या कार्यशाळेमध्ये नवी मुंबई पोलिसांनी छाप पाडली. या निमित्ताने घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत पहिले तीनही क्रमांक पोलीस आयुक्तालयातील अमलदारांनी पटकावले. प्रशिक्षण विद्यालयाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

राज्य पोलीस दल आधीच सक्षम त्याचबरोबर कार्यक्षम करण्याच्या अनुषंगाने गृह विभागाने पावले उचलले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षण करणे तसेच अंतर्गत शांतता राखणे त्याचबरोबर गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे याचे मोठे आव्हान खाकी वर्दी समोर असते. अनेक ठिकाणी, खून, दरोडे, महिला अत्याचार, घरफोड्या, सोनसाखळी चोरी, बतावणी करून लूट, त्याचबरोबर फसवणूक आणि सायबर संदर्भातील ही गुन्हे मोठ्या प्रमाणात घडतात. गुन्हा घडल्यानंतर त्याचे प्रगटीकरण व अन्वेषण करण्याची मुख्य जबाबदारी त्या त्या पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर असते. तपास अधिकाऱ्याला अंमलदाराकडून साह्य केले जाते. गुन्ह्यांची उकल करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाने तपास केला जातो. गोपनीय माहिती बरोबरच इतर अनेक पद्धतीचा अवलंब करता येतो. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात गुन्हेगारांना अधिक जलद ट्रॅप करता येऊ शकते.

दिवसेंदिवस तंत्रज्ञानामध्ये बदल होत आहे. अत्याधुनिक स्वरूपाची साधने उपलब्ध होत आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस खात्यातील प्रत्येक अंमलदार गुन्हे अन्वेषणामध्ये अपडेट असणे आवश्यक आहे. संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना कायद्याबरोबरच तांत्रिक तपासाची ही इत्यंभुत माहिती असणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक येथील गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयात दहा वर्षापेक्षा जास्त सेवा बजावलेल्या अंमलदारांना प्रशिक्षण दिले जाते. ६ ते १८ मार्च या कालावधीत अशा प्रकारची कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील निवडक अमलदारांना या ठिकाणी पाठवण्यात आले होते. नवी मुंबईतून पोलीस आयुक्तालयातून सुद्धा या प्रशिक्षणाला पोलीस कर्मचारी गेले होते. यशस्वी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या या अंमलदारांनी यावेळी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेमध्ये बाजी मारली.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पदभार घेतल्यानंतर नवी मुंबई पोलीस दलामधील कौशल्य, कार्यतत्परता आणि कर्तव्यदक्षता अधिक उजाळून निघाल्याचे एकंदरीत यावरून दिसत आहे.

गुन्हे अन्वेषणाबरोबरच वाहतूक व्यवस्थापनाचेही या कालावधीमध्ये प्रशिक्षण झाले. नवी मुंबई पोलीस दलातून अंमलदारांना प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले होते. या वेळी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत वाहतूक शाखेचे चंद्रशेखर प्रकाशराव वाघ यांनी प्रथम क्रमांक मिळवून नवी मुंबई पोलिसांची मान उंचावली.

### गुणवंत अमलदारांचा सन्मान

*समाजसेवा शाखेमध्ये कर्तव्यावर असणाऱ्या सविता म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर पनवेल शहर पोलीस ठाण्यातील अल्पेश पाटील आणि खांदेश्वर येथे नेमणुकीस असलेल्या चेतन घोरपडे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य अशोक नखाते, उपप्राचार्य जॉर्ज फर्नांडिस आणि सत्र संचालक राजेंद्र उशिरे यांच्या हस्ते गुणवंत अमलदारांना सन्मानित करण्यात आले.*

# दुचाकी घसरल्यावर मागून येणाऱ्या वाहनाच्या खाली येऊन तरुणाचा मृत्यू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ उड्डाणपूलावर शनिवारी साडेतीन चार वाजण्याच्या सुमारास झालेल्या अपघातात १९ वर्षीय अमन इर्शाद अन्सारी याचा मृत्यू झाला. दुचाकी घसरल्यावर मागून येणाऱ्या अज्ञात वाहनाच्या खाली तो आला होता. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

अमन अन्सारी हा वातानुकूलित यंत्राच्या दुरुस्तीचे काम करत असून शनिवारी दुपारी चारच्या सुमारास अमन अन्सारी हा खारघर येथील आपले काम आटोपून मुंबईच्या दिशेने तो आपल्या सहकार्या समवेत निघाला. नेरूळ येथील एल पी उड्डाण पुलावर चढताना एका खड्याला चुकवताना त्याच्या गाडीचा तोल गेला व गाडी घसरली. त्यात दोघेही खाली पडले.

वास्तविक अमन याने हेल्मेट घातले होते, मात्र त्याचा बेल्ट न लावल्याने तो घसरून पडताच त्याचे हेल्मेट त्याच्या डोक्यावरून निघून खाली पडले तेवढ्यात मागून येणाऱ्या अज्ञात वाहन त्याच्या वरून गेले आणि तो जागीच गतप्राण झाला.

या अपघातास कारण असणारे वाहन निघून गेले, मात्र मागून येणारी वाहने थांबली. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली होती. या अपघाताची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# गुढीपाडव्यानिमित्त महिलांसाठी बाईक रॅली

**उरण : बातमीदार**

हिंदू नववर्ष अर्थातच गुढीपाडवा. या हिंदू नववर्षाचे स्वागत उरण मध्ये विविध उपक्रम साजरे करून होत असून दि.२२ मार्च २०२३ रोजी सायंकाळी ४ वाजता वूमेन ऑफ विसडम या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून उरण शहरातील पेन्शनर्स पार्क येथून बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

नववर्षाचे स्वागत बाईक रॅलीने होणार असून सामाजिक कार्यकर्त्या सारिका पाटील यांच्या पुढाकाराने बाईक रॅली आयोजित करण्यात आले असून सामाजिक कार्यकर्त्या संगीता प्रशांत पाटील या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे आहेत. या बाईक रॅली फक्त महिलांसाठीच असून या बाईक रॅलीत जास्तीत जास्त महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे. इच्छुक महिलांनी सारिका सागर पाटील (९६६४९७९६९६) यांच्याकडे नाव नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रसायनी विद्यार्थी केंद्राचे पारितोषिक वितरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चांभार्ली येथील संपूर्ण रेगे हॉस्पिटल येथे रसायनी केंद्राचा पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात झाला. या वेळी विनायक वत्सराज, प्रकाशजी वाड, शीतल निकम आणि प्रसाद संसारे या मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.



यावर्षी केंद्राला अकरा सुवर्णपदक, नऊ रजत पदकं आणि चार कांस्यपदक मिळाली आहेत. ते सर्व विद्यार्थी आणि त्यांचे पालक या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते. दीप प्रज्वलन व एकात्मता मंत्राने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे आणि मान्यवरांचे स्वागत झाल्यावर एक छोटा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. महिला उद्योग मंडळ शाळा, रिलायन्स फाउंडेशन शाळा व शिवनगरच्या आनंद केंद्राचे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. गणेशनगरच्या आनंद केंद्रातील अगस्त्य कानिटकर याने एक देशभक्तीपर कविता तडफदारपणे सादर केली.

प्रास्ताविक संयोजिका वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी केले. प्रकाश व शीतल निकम यांची ओळख सुवर्णा राईलकर ने करून दिली. वत्सराजांची ओळख समीक्षा रहाळकरने करून दिली. यानंतर प्रकाश व शीतल यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला. त्यानंतर वत्सराज यांनी त्यांचे पनवेलच्या परीक्षांच्या वेळचे अनुभव सांगितले. त्यांच्याच प्रेरणेने रसायनी केंद्राची वाटचाल सुरू झाली व आज सहा वर्षे ती यशस्वीपणे सुरू आहे. त्यानंतर मुलांना वैदिक मंत्रांच्या गजरात मान्यवरांच्या हस्ते पदके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलिमा कुलकर्णी, अनुराधा होनावळे व शीतल कामत यांनी केले.

# वावेघर येथे लघुचित्रपट प्रदर्शन व परिसंवाद कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लेक लाडकी अभियान रायगड डॉ. मेघा देशपांडे आणि संवेदना डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वावेघर येथील गणपती मंदिरात शिक्षण व समानता या विषयावरील लघु चित्रपट 'उर्मी' दाखवण्यात आला. या वेळी वावेघर व रसायनी परिसरातील मान्यवरांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे पुस्तक. देऊन स्वागत करण्यात आले. गणपती कार नारळ वाढवून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. मेघा देशपांडे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यानंतर ॲड. वर्षा देशपांडे यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. माजी सरपंच कृष्णा पारंगे, रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शहा आदींनी या वेळी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संवेदना डेव्हलपमेंटच्या मोहिनी बागडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी वावेघरचे सरपंच विजय चव्हाण, सदस्य गुरुनाथ माळी यांचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमासाठी वावेघर उपसरपंच श्रृती माळी, रवी राठोड,, दिपीका ठाकूर, दत्ता देसाई, अरविंद पाटील, काशीनाथ खुडे, माधवी गाताडे, भाजप रसायनी विभाग उपाध्यक्ष मंदार गोपाळे, आदी उपस्थिती होते.

# 'फ्लाईंग राणी' ठरली एकांकिका स्पर्धेची विजेती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने 'नमुंमपा करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धे'च्या महाअंतिम फेरीनंतर झालेल्या पारितोषिक वितरण समारंभावेळी आमदार गणेश नाईक यांनी मनोगत व्यक्त केले.



प्राथमिक फेरीत सहभागी ४० एकांकिकांतून महाअंतिम फेरीसाठी निवडलेल्या १५ एकांकिकांमधून कलामंथन, ठाणे यांच्या 'फ्लाईंग राणी' या एकांकिकेने सर्वोत्तम सादरीकरण करीत नवी मुंबई महानगरपालिका राज्यस्तरीय करंडक ५० हजार रक्कमेचे पारितोषिक तसेच प्रशस्तिपत्रासह पटकाविला.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातून सादर झालेल्या एकांकिकांमधून सर्वोत्कृष्ट एकांकिकेचा ११ हजार रक्कमेसह प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्हासह विशेष पुरस्कार शिवरणभूमी प्रशांत प्रतिष्ठान, ऐरोली यांच्या 'आय एम पुंगळ्या शारूक्या आगीमहूळ' या एकांकिकेस प्राप्त झाला. या विजेत्यांना ऐरोली विधानसभा सदस्य आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. या वेळी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, शिक्षणाधिकारी अरूणा यादव, वाशीचे सहा. आयुक्त दत्तात्रय घनवट, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव तसेच महाअंतिम फेरीचे परीक्षक ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक कुमार सोहोनी आणि विजय केंकरे, अभिनेत्री ईला भाटे त्याचप्रमाणे प्राथमिक फेरीचे परीक्षक सुप्रसिध्द अभिनेते शेखर फडके, रवी वाडकर, वैभव सातपुते आदी उपस्थित होते.

नवी मुंबई महापालिकेने केलेल्या सुयोग्य आयोजनाची तिन्ही मान्यवर परीक्षकांनी प्रशंसा केली. दोन दिवस चाललेल्या महाअंतिम फेरीतील १५ एकांकिकांमधून कलामंथन, ठाणे यांच्या 'फ्लाईंग राणी' यांनी बाजी मारत नमुंमपा राज्यस्तरीय करंडक पटकाविला. माय नाटक कंपनीची 'गोदा' ही एकांकिका व्दितीय तसेच सिध्दरूढ, ठाणे यांची 'डिट्टो रखुमाई' ही एकांकिका तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी शिवाजी विद्यापीठ यांची 'विषाद' तसेच स्वभाव कल्याण यांची 'फॅमजॅम' या एकांकिका उत्तेजनार्थ पारितोषिकाने सन्मानीत झाल्या.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्वोत्तम एकांकिकेचे विशेष पारितोषिक शिवरणभूमी प्रशांत प्रतिष्ठान, ऐरोली यांच्या 'आय एम पुंगळ्या शारूक्या आगीमहुळ' या एकांकिकेने पटकाविले. या एकांकिकेचे दिग्दर्शक प्रशांत निगडे यांची एकांकिका यावर्षीच्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत व्दितीय क्रमांकाची मानकरी ठरलेली असून नवी मुंबईचा नावलौकिक राज्यभरात कलाप्रांतात वाढविणाऱ्या या रंगकर्मीचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला.

याशिवाय सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट लेखक, सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री, सर्वोत्कृष्ट संगीत, सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना, सर्वोत्कृष्ट नेपथ्य, सर्वोत्कृष्ट रंगभूषा व वेशभूषा अशी वैयक्तिक पारितोषिकेही रोख रक्कम, सन्मानचिन्हे, प्रशस्तिपत्रे स्वरूपात प्रदान करण्यात आली. प्राथमिक फेरीतील उत्तम अभिनयाची प्रशस्तिपत्रेही या वेळी वितरित करण्यात आली. त्याचप्रमाणे स्पर्धेत सहभागी सर्व ४० एकांकिका समुहांना प्रशस्तिपत्रांसह सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आले.

# कोप्रोलीमध्ये दोन दिवस धार्मिक कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली (उरण) व श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या सौजन्याने गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर मंगळवारी (दि. २१) ते बुधवारी (दि. २२) श्री साईबाबांचे साई चरित्र पारायण व श्री सत्यनारायण महापूजा व साई भंडाऱ्यांचे आयोजन उरण तालुक्यातील कोप्रोली गावातील गणेश मंदिर येथे करण्यात आले आहे.

श्री साई चरित्रपारायण वाचन, मध्यान्ह आरती, धूप आरती, शिवचरित्र व्याख्यान, कीर्तन, भजन, लोकगीत, भावगीत, महाप्रसाद आदी विविध कार्यक्रम गुढीपाडवा निमित्त कोप्रोली येथे आयोजित करण्यात आले आहे.

ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ क्रोप्रोली व श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था आयोजित दोन दिवस चालणाऱ्या या धार्मिक कार्यात सहभागी होऊन नागरिकांनी, साई भक्तांनी देवदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

## चवदार तळे सत्याग्रहाच्या वर्धापन दिनानिमित्त

# खारघरमध्ये आज अभिवादन सभा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या ९६व्या वर्धापन दिनानिमित्त अभिवादन सभेचे आयोजन प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली शांताबाई रामराव सभागृह, सत्याग्रह कॉलेज खारघर सेक्टर ७ येथे सकाळी दहा वाजता करण्यात आले आहे.

या वेळी पूज्य भदंत डॉ. ज्ञानदीप महाथेरो हे प्रमुख पाहुणे असून अभिवादन सभेस मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायींनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच या दिवशी मुंबईकडून महाडच्या दिशेला आणि महाड येथून मुंबई दिशेला येणाऱ्या व जाणाऱ्या डॉ. आंबेडकर अनुयायीसाठी खारघर येथील सत्याग्रह कॉलेजच्या वतीने सोमवारी (दि. २०) सकाळी १० ते रात्री १० या वेळेत स्पेगेटी खारघर टोलनाक्या जवळ पाणीपोई व अल्पोपहार याची व्यवस्था करण्यात आली असून याचा लाभ डॉ. आंबेडकरी अनुयायींनी घ्यावा, असे आवाहन डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी केले आहे.

# अल्पवयीन मुलावर २ महिने अत्याचार

## निषेधार्थ सुधागड तालुक्यात कडकडीत बंद; पालीमध्ये काढला मूक मोर्चा



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील एका अल्पवयीन मुलावर पालीतील अब्दुल कबले हा ५० वर्षीय इसम २ महिने भूल देऊन अनैसर्गिक शारीरिक अत्याचार करत होता. ही बाब नुकतीच समोर आल्याने कबले याच्या विरोधात पाली पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेच्या निषेधार्थ रविवारी (ता.१९) संपूर्ण सुधागड तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. तसेच आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी सर्व हिंदू समाजाच्यावतीने पालीतून मूक मोर्चा देखील काढण्यात आला.

हा मूक मोर्चा पाली शहरात बल्लाळेश्वर गणपती मंदिर ते तहसील कार्यालय येथून शिवस्मारक असा काढण्यात आला. यावेळी शेकडो नागरिक सहभागी झाले होते. पाली, परळी, पेडली या महत्वाच्या बाजारपेठा व इतर ठिकाणी देखील कडकडीत बंद पाळण्यात आला.

**पोलीस कायदेशीर कारवाई करत आहेत. पुरावे गोळा करून पूर्ण क्षमतेने न्यायालयापुढे ठेवले जातील. सुधागड तालुक्याला सलोखा व शांततेची परंपरा आहे. समस्त नागरिक ही परंपरा तशीच पुढे चालू ठेवतील याची खात्री आहे. समाज माध्यमांवर अफवा पसरवून सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

**-विश्वजीत काईंगडे,**
**पोलीस निरीक्षक, पाली**



### मुस्लिम समाजाचा मोर्चाला पाठींबा

**मुस्लिम समाजाच्या वतीने शनिवारी (ता.१८) पाली पोलीस स्थानकात संबंधित इसमावर कठोर कारवाई करण्यात यावी याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे. तसेच पालीतून काढण्यात आलेल्या मूक मोर्चाला देखील मुस्लिम समाजाच्या वतीने पाठिंबा दर्शवण्यात आला.**

माजी आमदार धैर्यशील पाटील यांचा भाजप प्रवेश

# रायगडातील आगामी निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलणार





### भाजपची ताकद वाढणार

**लढवय्या नेता, सर्व सामान्य जनतेत मिसळून राहणारा नेता म्हणून धैर्यशील पाटील यांची ओळख. त्यामुळे त्यांच्यावर प्रेम करणारे अनेक स्थानिक नेते व कार्यकर्ते त्यांच्यासोबत असल्याने रायगड जिल्ह्यात विशेषता दक्षिण रायगडमध्ये भाजपची ताकद वाढणार आहे.**

### दक्षिण रायगडात प्रभाव

**दक्षिण रायगडमधील विशेषता पेण, सुधागड,अलिबाग, रोहा यासह अन्य तालुक्यात माजी आमदार धैर्यशील पाटील यांची ताकद आहे. त्यामुळे भाजप यावेळी रायगड जिल्ह्यात निवडणुकीच्या माध्यमातून प्रभावीपणे दिसणार असल्याचे बोलले जात आहे.**

**रोहे : प्रतिनिधी**

राजकीय स्थित्यंतरे रायगड जिल्ह्यात जोरदार सुरु असताना माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी भाजपात प्रवेश केला. त्यांनी लगेचच दक्षिण रायगडचा दौरा सुरू केला आहे. त्यांच्याजवळ कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. त्यांच्या कामाची छबी पाहता व त्यांचा असलेला जनसंपर्क पाहता रायगड जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलणार असे बोलले जात आहे. त्यांच्या भाजप प्रवेशाने दक्षिण रायगडमध्ये भाजप बळकट होणार एवढे निश्चित.

उत्तर रायगडमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून भाजपने आपली ताकद कायम ठेवली आहे. रायगड जिल्ह्यात भाजपचा बालेकिल्ला पनवेल वगळता अन्य तालुक्यात संमिश्रपणे आहे. कृतिशील आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून भाजपचे पनवेल, उरण हे बालेकिल्ला आहे. माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या माध्यमातून दक्षिण रायगडमध्ये भाजपला मोठी ताकद मिळणार आहे.

अलिबागचा काही भाग, पेण, सुधागड, रोहा यासह दक्षिणगडमधील सुरुवातीला काही आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या माध्यमातून समीकरण बदलणार असल्याचे बोलले जात आहे.

रोहा शहरासह ग्रामीण भागातील एक प्रभावी गट माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्यासोबत असल्याने आगामी निवडणुकीत रोहा तालुक्यात भाजप प्रभाव पाडेल असे बोलले जात आहे. यावेळी आगामी रोहा अष्टमी नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपने आतापासूनच राजकीय संपर्क सुरू केला आहे. आगामी काळात रोहा शहरातून मोठा नेता भाजपकडे जाण्याची शक्यता आहे.

रायगड जिल्ह्यात माजी आमदार धैर्यशील पाटील यांची चांगली पकड आहे त्यांचा जनसंपर्कही दांडगा आहे. सध्या त्यांनी स्थानिक नेत्यांच्या गाठीभेटी सुरू केल्या आहेत. दक्षिण रायगडमध्ये माजी मंत्री व विद्यमान आमदार रवींद्र पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, माजी आमदार अवधूत तटकरे हे दिग्गज नेते असल्याने यावेळी दक्षिण रायगडमध्ये भाजप ताकतीने उतरण्याची तयारी करीत आहे.

आमदार महेंद्र दळवींच्या नेतृत्वावर तरुणाईचा विश्वास

# रोहा शिवसेनेत शेकडो तरुणांचा प्रवेश



**धाटाव : प्रतिनिधी**

राज्यातील सत्तांतरानंतर अलिबाग रोहा विधानसभा मतदारसंघाचे आ. महेंद्र दळवी यांचे नेतृत्वावर दिवसेंदिवस मतदारंघातील तरुणाईचा विश्वास वाढत आहे. रोहा शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली रोहा शहर व तालुक्यातील शेकडो तरुण शिवसेनेमध्ये प्रवेश करत आहेत. बुधवार १५ मार्च रोजी अलिबाग येथे आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीमध्ये शहरातील मोरे आळी, धनगर आळी यासह भातसई विभागातील शेकडो युवकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे आधी शिवसेना अधिकाधिक भक्कम होत विरोधकांना कडवे आव्हान उभे करण्यात यशस्वी होत आहे.

राज्यात जून महिन्यात विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्वाखाली क्रांतिकारक बंड झाल्यानंतर महाआघाडी सरकार जात पुन्हा एकदा भाजपा शिवसेना युतीचे सरकार स्थापन झाले. आता आपल्या विभागाला विकासात्मक कामे करताना कोणताही अडथळा नाही. आ. महेंद्र दळवींच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री ना. उदय सामंत यांच्या माध्यमातून भरघोस विकासनिधी मिळणार असा विश्वास प्रत्येक शिवसैनिकांत निर्माण झाला आहे. त्यामुळे रोहा तालुक्यात ॲड. मनोजकुमार शिंदे हे प्रत्येक वाडी वस्तीवर मूलभूत सुविधा व्हाव्यात यासाठी निधी उपलब्ध करण्यात यशस्वी होत आहेत. याच जाणिवेतून रोहा शिवसेनेत तरुण प्रवेश करत आहेत.

आमदार महेंद्र शेठ दळवी, तालुकाप्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे, शहर प्रमुख मंगेश रावकर यांच्या उपस्थितीत निलेश शेडगे, सिद्धांत भुतकर, सुजीत बांधले, निखिल जाधव, अजित पडवळ, सिध्देश शिंदे, प्रथमेश शिंदे, रितेश सावंत, विघ्नेश बांदल, सागर वरणकर, सुमित भोई, स्वप्निल भगत आदी शेकडो तरुणांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी युवासेना शहर प्रमुख सिद्धांत भुतकर, भातसई विभाग युवासेना प्रमुख निखिल जाधव, पाले व उपविभाग प्रमुख सूरज पोकळे खरापटी यांची नियुक्ती करण्यात आली.

### रायगडातील बाजारपेठात विविध योजनांची जागृती

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग, जिल्हा माहिती कार्यालय व श्री सिद्धिविनायक सामाजिक सांस्कृतिक मित्र मंडळ, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग सुनील जाधव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली समाज कल्याण विभागच्या स्टँडप इंडिया मार्जिन मनी, गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे योजना, वृद्धाश्रम योजना, कन्यादान योजना, रमाई आवास घरकुल योजना यांसह विविध योजनांची जनजागृती संजय नगर आदिवासी, हटाळे आठवडा बाजार, आक्षी साखरेत करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पथनाट्यातून होतेय प्रबोधन

या कलापथकाचे नेतृत्व शितल म्हात्रे करीत असून कलाकार म्हणून तुषान मढवी, श्रावणी राऊत, नेहा पाटील, सानवी म्हात्रे, मृदुला म्हात्रे, नेहा म्हात्रे सहभागी झाले असून साखरेत पथनाट्य यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी आक्षी सरपंच रश्मी पाटील, नागांव सरपंच निखिल मयेकर तर संजयनगर आदिवासी येथील कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी साळाव सरपंच सागर पाटील यांनी सहकार्य केले.

## युवासेना भातसई विभाग प्रमुखपदी निखिल जाधव यांची नियुक्ती



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील भातसई विभागातील युवा नेतृत्व निखिल जाधव यांची शिवसेनेच्या युवा सेना भातसई विभाग प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीचे पत्र आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते देण्यात आले.

आमदार महेंद्र शेठ दळवी, तालुकाप्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे, शहर प्रमुख मंगेश रावकर यांच्या उपस्थितीत नुकतेच निखील जाधव यासह रोहा शहरातील युवकांनी शिवसेना पक्षात पक्ष प्रवेश केला होता. या कार्यक्रमास उद्देश वाडकर, विकास पाटील, आशिष स्वामी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी युवासेना शहर प्रमुख सिद्धांत भुतकर, भातसई विभाग युवासेना प्रमुख निखिल जाधव (पाले) व उपविभाग प्रमुख सूरज पोकळे (खरापटी) यांची नियुक्ती करण्यात आली.

# कोकण विकास समितीच्या पाठपुराव्याला यश



**चौक : प्रतिनिधी**

कोकण विकास समितीच्या वतीने दोन वर्षापासून होत असलेल्या पाठपुराव्याला यश येत असुन दासगाव जेट्टी-गोठे दरम्यान सावित्री नदीवर पुलाची निर्मिती होऊन वीर-दासगाव जेट्टी-गोठे- करंजाडी नवीन रस्ता तयार होण्यासाठी आमदार भरत गोगावले यांनी प्रयत्न केल्याने येथील लोकांचे स्वप्न पुर्ण होण्यास मदत झाली आहे.

रस्ता पुढे विन्हेरे-फाळकेवाडी-तुळशी मार्गे तुळशी रोड जंक्शनवर मुंबई गोवा मार्गाला जोडला जाणार आहे. या विषयावर महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार गोगावले यांनी कोकण विकास समितीला मदत केली असून त्यांनी परिसरातील लोकांबरोबर व संबंधित अधिकारी यांना घेवून बाळासाहेब भवन मुंबई या ठिकाणी कोकण विकास समितीचे सदस्य, महाड खाडीपट्ट्यातील सदस्य, तुळशी, विन्हेरे व पंचक्रोशीतील सदस्य यांच्या समवेत चर्चा केली.

समितीचे संस्थापक अध्यक्ष जयवंत शंकरराव दरेकर यांनी या विषयावर केलेला पाठपुरावा ज्यामध्ये उप अभियंतापासून मंत्रालय सचिव स्तरापर्यंतपर्यंत तसेच खासदार, आमदार यांना केलेला पाठपुरावा, या रस्त्याचा अंदाजित खर्च तसेच हा रस्ता निर्माण झाला तर होणारे फायदे काय असतील याबाबत चर्चा केली.

आमदार भरतशेठ गोगावले यांनी वरीष्ठ अभियंता यांच्या समवेत बैठक आयोजित केली आहे. कोंकण विकास समिती, महाड खाडी पट्ट्यातील सव, गोठे, मुठवली, रावढळ, कोसबी, चिंभावे, तुडील, नरवण, भेलोशी, खुटील, मुमुर्शी, जुई, सोनघर, बेबलघर, आदीस्ते, वलंग, वामणे, नडगाव, चोचीदे त्याचप्रमाणे महाड - करंजाडी-फौजी आंबवडे - विन्हेरे- कावळे - कुंभरडे, फाळके वाडी- तुळशी गावांतील सदस्य यांना सोबत घेऊन सर्व्हे करणेसाठी सूचना दिल्या.

चर्चेत मनोज मधुकर सुर्वे, एकनाथ सुकून,ड. विशाल गोलांबडे, समीर मधुकर रेवाळे, राजेश जाधव, शांताराम वामन सुर्वे, महेश चव्हाण, नरेंद्र वसंत दरेकर, संजय बळीराम दरेकर, संजय मधुकरराव दरेकर, अनिल झोरे, सचिन देवळे, संतोष फिलसे, गणेश मौले, अनंत दवंडे, शरद रसाळ, सत्यवान यादव, सुनील देवळे, दिलीप देवळे, मिलिंद चिबडे, नैनेश बैकर, संदीप माने, इतेश खोपटकर, नितीन घाणेकर, नीतेश मोरे,अशोक आंबेकर, सचिन खाडे, मुकेश गोरे, राजेश निंबरे, सुनील जाबरे, संतोष पातेरे, किसन मोरे, सुरज आराव, तुळशीराम पोळ, मुरलीधर बुरटे, प्रमोद जगदाळे, मंगेश जगताप, मारुती रेवाळे, प्रकाश गोडांबे, प्रदीप साळवी, रोहिदास लोखंडे, सूरज आराव, चंद्रकांत आग्रे, सनी कदम, दिनेश कदम आदी सदस्यांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेतला.

## जंजिरा मेडिकल असोसिएशनतर्फे डॉ. दर्शन जैन यांचा विशेष सत्कार

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगावमध्ये राहणारे कोकबन येथील वैद्यकीय अधिकारी अधिकारी डॉ. प्रवीण जैन यांचा मुलगा डॉ. दर्शन जैन याने एम. डी. होण्यासाठी नीट पीजी परीक्षेत संपूर्ण देशातून २० वा नंबर आल्याने डॉ. दर्शन जैन यांचा सत्कार जंजिरा मेडिकल असोसिएशन तर्फे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करुन पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी जंजिरा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, उपाध्यक्ष डॉ. मंगेश पाटील, डॉ. हितेश जैन, सचिव डॉ. वासिम पेशीइमाम, कोषाध्यक्ष डॉ. सुनील पटेल, माजी अध्यक्ष डॉ. राज कल्याणी, डॉ. अंनत जोशी, डॉ. अमित बेनकर आदी उपस्थित होते.

यावेळी दर्शन जैन यांनी सांगितले की, आई- वडीलांच्या आशिर्वादामुळेच मी इथपर्यंत पोहचलो. त्यांच्या आशिर्वादामुळेच पुढील एम. डी. चे शिक्षण पूर्ण करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.



# पीक संरक्षण घरच्या घरी उपयोगी आहे निंबोळी अर्क

रसायनांच्या अतिवापरामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास सुध्दा निश्चितपणे थांबविता येऊ शकतो. त्यासाठी एकात्मिक किडरोग पध्दतीमधील शिफारसीचा अवलंब सर्वांनी करावा. त्या पध्दतीमधील महत्वाचा व तितकाच प्रभावी उपाय म्हणजे निंबोळी अर्क. काय आहे निंबोळी अर्क तयार करण्याची पध्दत, त्याचे लाभ समजून घेवू...!

निंबोळी अर्क तयार करण्याची पध्दत : शेतीच्या बांधावरील, रस्त्याच्या कडेला असलेल्या कडुनिंबाच्या झाडाखाली पडलेल्या चांगल्या पिकलेल्या निंबोळ्या वेचून गोळा करा. गोळा केलेल्या निबोळ्यांची साल वेगळी करून बियांचा गर स्वच्छ धुवून काढा. गरात साखरेचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यावर बुरशी वाढण्याची शक्यता असते. साल व गर काढलेल्या निंबोळीच्या बिया चांगल्या सुकवून कोरड्या जागी साठवून ठेवा. चांगल्या सुकलेल्या निंबोळ्यांच्या बिया घेऊन त्या खलबत्यात कुटून चांगल्या बारीक करून घ्या. प्रमाणात निंबोळ्या गोळा झाल्या असल्यास पल्वरायझरच्या सहाय्यानेसुध्दा पावडर करता येईल. फवारणीच्या आदल्या दिवशी सायंकाळी पाच किलो बारीक केलेली निंबोळी पावडर नऊ लिटर भिजत टाका. तसेच एक लिटर पाण्यात २०० ग्राम साबणाचा चुरा वेगळा भिजत टाका. दुसऱ्या दिवशी सकाळी भिजत टाकलेल्या निंबोळीच्या अर्क स्वच्छ कपड्यातून चांगला गाळून या अर्कात १ लिटर पाण्यात तयार केलेले साबणाचे द्रावण मिसळा. हा अर्क १० लिटर होईल एवढे पाणी टाका. एका टाकीमध्ये ९० लिटर पाणी घ्या व वरील १० लिटर चे द्रावण त्यामध्ये मिक्स करून घ्या आणि ढवळा. अशा प्रकारे ५% निंबोळी अर्क तयार झाला आहे. ५% निंबोळी अर्क ५००-१००० मि.ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. निंबोळी अर्क फवारणीच्या दिवशीच तयार करून वापरावे. मावा, अमेरिकन बोंडअळ्या, तुडतुडे, पाने पोखरणारी व देठ कुरतडणारी अळी, फळमाशा, खोडकीडा अनेक किडींवर याचा प्रभाव पडतो तसेच फवारणीमुळे रसशोषक किडींचा प्राभाव कमी होतो.

पिकातील किडींच्या नियंत्रणासाठी महागडी रासायनिक किटकनाशके किंवा ज्याच्या गुणवत्तेबाबत फारशी खात्री देता येणार नाही, अशी सेंद्रीय उत्पादने बाजारातून खरेदी करण्यापेक्षा निसर्गतः उपलब्ध असलेल्या निंबोळीच्या वापरामुळे अगदी अल्प खर्चात घरच्याघरी प्रभावी नैसर्गिक किटकनाशक तयार होते. याचा प्रत्येक शेतकऱ्यांनी वापर करावा आणि रसायनांमुळे होणारे दुष्परिणाम टाळण्याबरोबरच उत्पादन खर्चात सुध्दा काटकसर करून आपला निव्वळ नफा वाढवावा, असे आवाहन जिल्ह्यातील समस्त शेतकरी बंधू-भगिनींना करण्यात येत आहे. तसेच अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी सहायक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

**-मनोज सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी

# बंगळुरूचा गुजरातवर दणदणीत विजय



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बंगळूर संघाने गुजरातवर आठ विकेटने दणदणीत विजय मिळवून महिला प्रीमियर लीगमधील आव्हान कायम ठेवले. झंझावाती खेळी करणाऱ्या सोफी डेव्हिनचे शतक एका धावेने हुकले.

स्पर्धेतले आव्हान कायम ठेवायचे, तर केवळ विजय नव्हे, तर सरासरीही उंचावण्याची गरज असलेल्या बंगळूर संघाने १८९ हे मोठे आव्हान १५.२ षटकातच पार केले. सोफी डेव्हिनने ३६ चेंडूत तब्बल २७५च्या स्ट्राईक रेटने ९९ धावा टोलावल्या. यात तिने ९ चौकार आणि आठ षटकार मारले. फॉर्म सापडलेल्या स्मृती मानधनाने ३१ चेंडूत ३७ धावा केल्या. या दोघांनी ९.२ षटकांत १२५ धावांची सलामी दिली.

तत्पूर्वी लौरा व्हॉलवर्ट (६८) आणि अँशले गार्डनर (४१) यांच्या फटकेबाजीमुळे गुजरात संघाने २० षटकांत चार बाद १८८ धावा केल्या, परंतु विजयासाठी त्या पुरेशा ठरल्या नाहीत.

**संक्षिप्त धावफलक :**
लौरा व्हॉल्वर्ट ६८-४२ चेंडू, नऊ चौकार, दोन षटकार, एस. मेघना ३१-३२ चेंडू, चार चौकार, अॅशले गार्डनर ४१ - २६ चेंडू, सहा चौकार, एका षटकार, दयालन हेमलता नाबाद १६ -६ चेंडू, दोन चौकार, एक षटकार, हर्लिन देओल नाबाद १२-५ चेंडू, एक चौकार, एक षटकार, सोफी डेव्हिन ३-०-२३-१, श्रेयांका पाटील २-०-१७- २)

झुंझार युवक मंडळ पोयनाड क्रिकेट स्पर्धा

# प्रतीक क्रिकेट अकॅडमीची उपांत्य फेरीत धडक

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित कै. अॅड. शिरीष पाटील स्मृतीचषक एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत प्रतीक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघांनी जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाचा पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली आहे.



शनिवारी झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात प्रथम नाणेफेक जिंकून फलंदाजी स्विकारत ४० षटकांच्या समाप्तीनंतर २४१ धावा धावफलकवर नोंदवल्या. मधल्या फळीतील फलंदाज आर्यन जाधव यांनी सर्वाधिक ७२ तर विघ्नेश पाटील यांनी ४९ धावांचे योगदान संघाला दिले. अलिबाग संघाकडून ओम भगत, आर्यन दवटे, राघव मुळे यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले.

प्रतिउत्तर देतांना अलिबाग संघांनी कडवी झुंज देत २१० धावांपर्यंत मजल मारली. ओम भगत यांनी सर्वाधिक ७१ तर ओम वार्डे यांनी ३३ धावा केल्या.

पनवेल संघाकडून ओंकार राक्षीकार यांनी चार फलंदाज बाद केले. पनवेल संघाने सामना ३१ धावांनी जिंकला. सामनावीर म्हणून आर्यन जाधव, ओम भगत स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू, उत्कृष्ठ क्षेत्ररक्षक मंथन पाटील, जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाला स्पर्धेतील चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक रायगड जिल्हा वकील संघटनेचे नवनिर्वाचित सदस्य अॅड. कौस्तुभ पुनकर, जयप्रकाश पाटील, संचित म्हात्रे, अजय टेमकर, राजेंद्र जाधव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# अलिबाग कला, क्रीडा महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

नेहुली क्रिडा संकुल शनिवारी (दि. १८) येथे पहिल्या अलिबाग कला क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात खेळाडू, पालक आणि प्रेक्षकांच्या उपस्थितीमध्ये झाले.

माणुसकी प्रतिष्ठान, रायगड प्रिमियर लिग आणि सुरभी स्वयंसेवी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महोत्सवात सर्व मैदानी स्पर्धा लक्षवेधी होत्या. त्यामध्ये मिहीर व कथा वाडकर यांची कामगिरी लक्षणीय ठरली. हे दोन्ही खेळाडू अॅथलॅटिक्स स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू ठरले.

मैदानी स्पर्धेचे यशस्वी आयोजन यतिराज पाटील आणि त्याच्या सहकाऱ्यांनी केले. दुसरी स्पर्धा लाठी-काठी या क्रिडा प्रकाराच्या स्पर्धेचे उद्घाटन आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी राजिप स्वच्छता पाणी समन्वयक जयवंत गायकवाड, माणुसकी प्रतिष्ठान चे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, रायगड प्रिमियर लिग सचिव जयंत नाईक, सुरभी स्वयंसेवी संस्थेच्या अध्यक्ष सुप्रिया जेधे, रायगड प्रिमियर लिगचे सहसचिव संदीप जोशी, वरसोली क्रिकेट मंडळाचे संदेश गुंजाळ उपस्थित होते. लाठी असोसिएशन अलिबागचे अध्यक्ष प्रमोद बाळकृष्ण मसाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. लाठी-काठी क्रीडा प्रकारातील आंतरराष्ट्रीय पंच प्रियांका संदेश गुंजाळ तसेच राष्ट्रीय पंच शुभम महेंद्र नखाते, वेदांत संदेश सुर्वे, माही खबीस, रूपेश शेळके यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

लाठीकाठी स्पर्धेमध्ये अलिबाग तालुक्यातील १५ शाळांमधील ८५ विद्यार्थी सहभागी झाले होते. भोनंग येथील सहभागी विद्यार्थांनी आपल्या कौशल्याने विशेष दाद मिळवली.



**पनवेल : भारतीय जनता पक्ष पुरस्कृत जय हनुमान कुस्ती संघ, कामोठेच्या माध्यमातून आयोजित आमदार केसरी भव्य कुस्ती स्पर्धेचे पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी उद्घाटन करण्यात आले. कुस्तीचा प्रचार आणि प्रसार हे उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्थापित केलेल्या जय हनुमान कुस्ती संघाच्या माध्यमातून कामोठे पोलीस स्टेशन समोरील मैदानात ही कुस्ती स्पर्धा रंगणार आहे. माजी नगरसेवक विकास घरत आणि युवा नेते हॅप्पी सिंग यांनी कुस्त्यांचे सामने आयोजित केले असून या स्पर्धेत विजेत्या पैलवानाला पहिले इनाम एक लाख २१ हजारांचे बक्षीस मिळणार आहे. दुसरे इनाम एक लाख ११ हजार, तिसरे इनाम ८० हजार, चौथे व पाचवे इनाम प्रत्येकी ६० हजार व ४० हजार इतके आहे.**

# आजपासून आशियाई खो-खो स्पर्धा



**नवी मुंबई : बातमीदार**

आशियाई खो-खो स्पर्धा गुवाहाटी, आसाम येथे २० ते २३ मार्च या कलावधीत होत असून स्पर्धेत भारतासह, बांगलादेश, नेपाळ, भुतान, मलेशिया, इंडोनेशिया, इराण, इराक, सिंगापूर, द. कोरिया, श्रीलंका आदी देश सहभागी होणार असल्याचे खो-खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल व सेक्रेटरी एम. त्यागी यांनी स्पष्ट केले आहे.

या स्पर्धेसाठी खो-खो फेडरेशन ऑफ इंडियानच्या वतीने महाराष्ट्रातील काही महत्वाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व पंच प्रमुख भूमिका बजावणार आहेत. महाराष्ट्राचे महेश पालांडे यांची भारतीय पुरुष संघाच्या प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे. संतोष सावंत व गंधाली पलांडे हे पंच म्हणून या स्पर्धेत काम पाहणार आहेत, तर अमित राव्हटे यांची फिजिओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय संघ निवड समिती सदस्य म्हणून महाराष्ट्राचे सरचिटणीस गोविंद शर्मा यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्याबरोबर मुन्नी जॉन, एम. एस. मलिक, सुमित भाटीया, सुषमा गोळवलकर व सी. मनोहर यांचीसुद्धा निवड झाली आहे.

# जागतिक महिला बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत नीतू, प्रीती, मंजू उपउपांत्यपूर्व फेरीत दाखल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

येथे सुरू असलेल्या जागतिक महिला बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय बॉक्सर्सची प्रगती कायम राहिली आहे. शनिवारी आणखी तिघींनी उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती नीतू गंघास (४८ किलो) हिने कोरियाच्या डोयोन कांगचा पराभव करून शानदार सुरुवात केली. ५४ किलो गटात प्रीतीने रुमानियाच्या लाक्रामिओरा प्रीजोकवर ४-३ असा विजय मिळवला, तर मंजू बंबोरिया (६६ किलो) हिने न्यूझीलंडच्या कॅरा व्हेरेओचा ५-० असा धुव्वा उडवला.



गतवेळच्या या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत नीतूचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले होते. यंदा मात्र धडाक्यात सुरवात करताना तिने प्रतिस्पर्ध्यावर अवघ्या १११ सेकंदात विजय मिळवला. लढतीस सुरुवात झाल्यानंतर नीतूने हूक आणि तिरसक पंच मारण्यास प्रारंभ केला, परंतु हे फटके योग्य ठिकाणी लागत नव्हते. नीतूने आपला पवित्रा लगेचच बदलला आणि दोन्ही हातांनी पंचचा हल्लाबोल सुरू केला. नीतूच्या या प्रहारापुढे हतबल झालेल्या डोयोनने हार स्वीकारली.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com